अंतरलहरी

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

जानेवारी - एप्रिल २०१७ वर्ष १० अंक १ पृष्ठ १२ रु. २/-

आसक्ती ही आत्मवंचना असते

ती खोली चांगली प्रशस्त व आरामशीर होती. तेथील सर्व वस्तूंमध्ये व त्यांच्या मांडणीमध्ये एक प्रकारची उच्च अभिरूची दिसून येत होती. जमिनीवर अंथरलेला गालिचा चांगला जाड व मऊ मऊ होता. भिंतीतील संगमरवरी शेकोटीतील विस्तव फुललेला होता. खोलीत वेगवेगळ्या ठिकाणी फुलदाण्या जगातील नाना देशांतून आणलेल्या दिसत होत्या. भिंतीवरील काही चित्रे जशी आधुनिक पद्धतीची होती, तशीच काही पुरातन नामवंत चित्रकारांची होती. या सजावटीतून संपत्ती व अभिरुची या दोहोंचाही प्रत्यय स्पष्टपणे येत होता. खोलीच्या खिडकीतून नजर टाकली की, लहानशी बाग दृष्टीस पडत होती. बागेतील हिरवळीची मशागत वर्षानुवर्षे अतिशय दक्षतेने केली गेली होती, हे स्पष्ट दिसत होते.

शहरांतील जीवन हे नैसर्गिक जगापासून चमत्कारिक रीतीने तुटले गेलेले असते. निसर्गातील दऱ्याखोऱ्यांच्या व डोंगरपर्वतांच्या जागी, मानवाने बांधलेल्या उंच उंच इमारती येथे उभ्या ठाकलेल्या असतात. निसर्गातील गरजणाऱ्या, खळखळणाऱ्या ओढ्या-निर्झरांची जागा, येथील वाहनांच्या कोलाहलाने घेतलेली असते. रात्री तर शहरात दिव्यांचा एवढा झगझगाट असतो की, चांदण्या पाहण्याची आपल्याला कितीही उत्कंठा असली तरी त्या दिसणे कठीण होऊन बसते आणि दिवसा आकाशाचे दर्शन घडते, ते तर गगनचुंबी इमारतीमधून आकाशाचा जो तुकडा दिसेल, तेवढ्यापुरतेच मर्यादित असते. या सर्व गोष्टींचा शहरातील लोकांवर एक चमत्कारिक परिणाम घडून आलेला निश्चित दिसून येतो. शहरी लोकांत एक तऱ्हेची नागरी चमक दिसते खरी, पण त्यांच्या वृत्तीत एक तऱ्हेचा ठिसूळपणा आढळतो. शहरात नसते तरी काय? तेथे देवळे असतात, मंदिरे असतात; नाना संग्रहालये असतात; मदिरापानगृहे असतात व चित्रपटगृहे असतात. सुंदर सुंदर कपडे दिसतात आणि अगणित दुकाने आढळतात. शहरामध्ये जिकडे पाहावे तिकडे माणसेच माणसे दृष्टीस पडतात. घराघरातून, खोल्याखोल्यांतून व रस्त्यारस्त्यांतून माणसांची दाटी झालेली आढळते. आकाशातून एखादा सुंदर मेघ, तरंगत चालला असला तरी त्याच्याकडे क्वचितच कुणाचे लक्ष जाते. जिकडे तिकडे नुसती घाईगर्दी व धावपळच चाललेली असते.

या खोलीच्या वातावरणात मात्र नि:स्तब्धता नांदत होती व एक प्रकारचा शालीन संयम साठला होता. धनवंताच्या ठायीच आढळणारी दूरस्थपणाची, सुरक्षिततेची व विपुलतेची भावना तेथे दृष्टीस पडत होती. तो गृहस्थ सांगत होता की, पौरस्त्य व पाश्चात्त्य अशा उभय तत्त्वज्ञानाची आपणांस आवड आहे; आणि ग्रीक संस्कृतीपासून मानवी संस्कृतीचा प्रारंभ झाला, त्यापूर्वी कोठेच संस्कृती अस्तित्वात नव्हती, असे जे पाश्चात्त्य तत्त्वज्ञ म्हणतात, ते अगदी वेडगळपणाचे आहे. एवढ्या प्रास्ताविकानंतर त्याने आपल्या स्वत:च्या समस्येबद्दल बोलण्यास सुरुवात केली. त्याच्या जवळच्या मोठ्या संपत्तीबद्दलची व तिच्याबरोबर येणाऱ्या विविध जबाबदाऱ्यांची समस्या त्याला बेचैन करीत होती. दान कुणाला द्यावे व कशा प्रकारे द्यावे, याचा त्याला प्रश्न पडला होता. पण या गोष्टीची तो समस्या का बनवून टाकीत होता? कुणालाही दान दिले व कोणत्याही भावनेने दिले, तरी त्या गोष्टीला खरोखर काही महत्त्व आहे का? या गोष्टींची त्याच्या दृष्टीने समस्या का होऊन बसली होती?

काही वेळाने त्याची पत्नी खोलीत आली. तिचा चेहरा नीटस व पाणीदार होता. मुखावर कुतूहलाची भावना स्पष्टपणे उमटलेली दिसून येत होती. त्या दोघांचे वाचन चांगले असलेले दिसत होते व दोघांतही एक प्रकारचा चोखंदळपणा व व्यवहारदक्षता आढळून येत होती. दोघेही बुद्धिमान होते व दोघांनाही अनेक विषयांची आवड होती. ग्रामीण व नागरी अशा उभय संस्कृतींचा समन्वय त्यांच्यात दिसून येत होता. तरीही त्यांची अंत:करणे नागरी जीवनातच अधिक रमत होती. करुणेची भावना त्यांच्या हृदयापासून दूरदूर निघून गेलेली होती. त्यांच्या विविध गुणांचा विकास झालेला होता व त्याला एकप्रकारचा धारदारपणा व एक तऱ्हेची व्यवहारनिष्ठुरता प्राप्त झाली होती. पण तिचाही आवाका मर्यादितच होता. ती थोडेबहुत लेखन करीत होती आणि तो राजकारणात थोडेबहुत लक्ष घालीत होता. कोणत्याही गोष्टीबद्दल बोलताना ते अगदी सहज आत्मविश्वासाने बोलत होते. वस्तुत: कोणत्याही शोधासाठी, अन्वेषणासाठी, कोणत्याही गोष्टीचा यथार्थ बोध होण्यासाठी थांबणे, थबकणे, हळुवारपणे चाचपडत राहणे हे आवश्यक असते. पण जेव्हा माणसाजवळ विपुल ज्ञानसंचय असतो, तेव्हा स्व-रक्षणाचे आपले चिलखत त्याने घासून पुसून लख्ख केलेले असते, आणि त्याला गेलेल्या तडा आतून पूर्णपणे बुजवून टाकलेल्या असतात. तेव्हा हे थबकणे, हे घुटमळणे, हे निर्णयाप्रत न येणे, त्याला कसे शक्य होईल? संवेदनांच्या बंधनातच ते अडकलेले असतात त्यांना रेषांचे, आकृतींचे व रूपांचे अवास्तव महत्त्व वाटत असते. त्यांच्या लेखी सौंदर्य म्हणजे केवळ संवेदन, शिवत्व म्हणजे केवळ भावना आणि सत्य म्हणजे केवळ बुद्धिविलास. संवेदना जेव्हा माणसावर वर्चस्व गाजवू लागतात, तेव्हा शरीरालाच नव्हे, तर मनालाही आराम व सुखासीनता ही अतिशय आवश्यक होऊन बसतात. मनाला अशाप्रकारे आवश्यक होऊन बसलेली ही सुखासीनता व आरामप्रियता माणसाचे मन आतून पोखरून टाकते, गंजून टाकते व तीच संभ्रमांना जन्म देते.

संपादकीय

आत्मवंचना

भ्रम म्हणजे जे सत्य नाही ते. असे अनेक भ्रम घेऊन जेव्हा आपण जगतो तेव्हा आपण जे सत्य नाही तेच सत्य मानत असतो, म्हणजे स्वत:ला फसवत असतो. कृष्णमूर्ती म्हणतात, ''भीती भ्रम निर्माण करते.'' असुरक्षित मन एकामागून एक भ्रम निर्माण करते आणि स्वत:ला फसवत राहते. आपण स्वत:ला फसवत आहोत हे आपल्याला बऱ्याच वेळा कळलेले नसते, ते तपासण्याची भीती असते. जरी त्याची जाणीव झाली तरीही भ्रमात राहणे सोईचे व सवयीचे झालेले असते.

देव, धर्म, देश हे सर्वात मोठे भ्रम आहेत, पण कालांतराने ते अंतीम सत्य वाटत आहेत. त्यांना आव्हान करणे म्हणजे 'मी'च्या अस्तित्वाला आव्हान आहे, त्याच्या सुरक्षिततेला धोका आहे. कारण 'मी' त्याच्याशी एकरूप झालेला असतो. पण आपण ह्यात इतके फसलेले असतो की त्यातील धोके आपल्याला दिसत नाहीत. त्यातील फायदे पाहण्यात आपण स्वत:ला फसवत राहतो. आणि त्या भ्रमातून आतंकवादासारखे निर्माण झालेले धोके आपल्याला दिसत नाहीत.

तसेच आपण कुटुंब, पैसाअडका ह्यात पण संरक्षण पाहतो. ह्यात मोहाचाही मोठा भाग असतो. मुलेबाळे व पैसा ह्यात भविष्यातील सुख व सुरक्षा पाहतो. पण त्यातही सुखापेक्षा अधिक त्रास भोगतो; तरीही त्याचा मोह असतो. विशेषत: मोठी संपती अनेक जंजाळं आणि धोक्यांना कारणीभूत असते.

ज्याच्यामध्ये सुरक्षा आहे असे वाटते तेच धोक्याचे, दु:खाचे, बंधनाचे कारण आहे हे दिसत असताना नजरेआड करणे ह्यापेक्षा स्वत:ची दुसरी काय फसवणूक असू शकते?

वस्तुस्थिती अशी असते की ज्या वस्तू आपल्या मालकीच्या होऊन बसतात, ज्यांना आपण बिलगून बसलेलो असतो किंवा ज्यांच्यात आपले मन गुंतलेले असते, आसक्त झालेले असते, त्या साऱ्या वस्तू म्हणजे वस्तुत: आपणच असतो. आसक्तीत कसलीही उदात्तता नसते. ज्ञानाविषयीची आसक्ती ही इतर कोणत्याही सुखद व्यसनांपेक्षा मुळीच वेगळ्या दर्जाची नसते. आसक्तीची पातळी ही अगदी खालच्या स्तराची असो की, वरच्या स्तराची असो, अखेर ती केवळ स्वार्थपरायणता वा आत्मपरायणताच असते. आसक्ती ही आत्मवंचना असते. अहंच्या पोकळपणापासून, रितेपणापासून दूर जाण्याची ती एक पळवाट असते. म्हणूनच, मालमत्ता, व्यक्ती किंवा कल्पना, विचार अशांसारख्या ज्या ज्या गोष्टींबद्दल आपल्याला आसक्ती असते, त्या सर्व गोष्टी आपणांस सर्वंकष महत्त्वाच्या वाटू लागतात. कारण अहंचा रितेपणा भरून टाकणाऱ्या या गोष्टी जर नसत्या, तर आपल्या अहंचे अस्तित्वच नाहीसे होईल, असे भय आपल्याला सदैव वाटत राहते. या भयामुळे आपण कुठल्या ना कुठल्या गोष्टी जमवीत राहतो, त्यांच्यावर मालकी मिळवीत राहतो. हे भयच संभ्रमांना जन्म देत असते आणि निश्चित स्वरूपाच्या निर्णयांच्या बंधनात माणसाला जखडून टाकते. अशा प्रकारे भौतिक स्वरूपाच्या किंवा काल्पनिक, मानसिक स्वरूपाच्या निर्णयात मन जखडले की, बुद्धीचा-प्रज्ञेचा सफल विकास अवरुद्ध होतो आणि अशा विकासाला आवश्यक असणारे स्वातंत्र्यही नष्टप्राय होऊन बसते. सत्याचा उदय अशा स्वातंत्र्यातच होत असतो. पण असे स्वातंत्र्य नसते की, केवळ चतुरताच बुद्धी म्हणून मानली जाते. या चतुरतेचे व्यापार हे फार गुंतागुंतीचे व विनाशकारी असतात.आत्मरक्षण करू पाहणारी ही चतुरताच मग आपली कुठे ना कुठे आसक्ती जडवते आणि या आसक्तीमुळे जेव्हा दु:ख निर्माण होते, तेव्हा हीच चतुरता अनासक्तीच्या मागे धावते आणि त्यागाच्या व संन्यासाच्या अभियानातून नवे सुख मिळवू पाहते. म्हणून या चतुरतेच्या विविध व्यापारांचा, मनाच्या विविध व्यापारांचा यथार्थ बोध करून घेणे आवश्यक आहे. असा बोध करून घेणे म्हणजेच खऱ्या बुद्धीचा व प्रज्ञेचा उदय होय.

जीवनभाष्ये खंड १, प्र. ४५

मनाला मुक्त करणे

तुम्ही तुमच्या दैनंदिन जगण्यासाठी खूप कष्ट करीत असता, तुमचा उदरनिर्वाह करण्यासाठी नोकरी करताना वरिष्ठांचा त्रास सहन करीत तुम्ही वर्षानुवर्षे घालवता; अपमान सहन करीत, गैरसोयी सोसत, स्वाभिमानाची किंमत देत, लाचार होत नोकरी करता. परंतु मन मुक्त ठेवत काम करणे हे फारच दुष्कर असते. त्याला मोठी अंतर्दृष्टी लागते, मोठं आकलन लागते, विशाल अवधान – ज्यामध्ये मनाला त्यातील अडथळे, त्यातील बंधने, आत्मवंचनेच्या हालचाली, त्याचे स्वप्नरंजन, त्याचे भ्रम, गूढता यांची जाणीव होते. एकदा मन मुक्त झाले की ते शोध करणे सुरू करू शकते, संशोधन करू शकते, परंतु मन मुक्त नसताना शोध घेऊ पाहते तेव्हा त्याला काही अर्थ नसतो. तुम्हाला समजतंय का? मनाला सत्य, ईश्वर आणि जीवनातील या असामान्य सौंदर्य आणि गहनतेचा वेध घेण्यासाठी, प्रेमाच्या परिपूर्तीची अनुभूती होण्यासाठी, ते मन मुक्त असले पाहिजे, जे मन परंपरांच्या मर्यादांमध्ये अडकलेले असेल, संस्कारबद्ध असेल, असे मन जेव्हा म्हणते की, 'मला सत्य शोधायचं आहे, ईश्वर शोधायचा आहे' तेव्हा त्याला अर्थ नसतो. असे मन म्हणजे एका खांबाला दोरखंडाने बांधलेल्या गाढवासारखे असते. ते गाढव त्या दोरखंडाच्या लांबीपेक्षा पुढे फिरत जाऊ शकत नाही.

Collected Works, Vol. X, 164
Individual and Society

ज्ञाताच्या नानाविध स्वरूपांमागे धावत सुटणे हा केवळ आत्मवंचनेचा खेळ होय

ध्यान ही जीवनातील अत्यंत महान कृती आहे. सर्वात श्रेष्ठ व अथांग आशयाने परिपूर्ण अशी जर जीवनातील कोणती कृती असेल, तर ती ध्यान हीच होय. पण ध्यानाचा मधुर परिमल हा सहज हस्तगत होण्यासारखा नसतो. प्रयत्नाने किंवा सवयीने ध्यान साध्य करता येत नसते. मनुष्याने जर एखादी विवक्षित साधना केली तर तिचे ईप्सित फल त्याला प्राप्त होईलही. पण कोणत्याही साधनेची पद्धती व रीत ही अखेर मत्सर व लोभ यांच्यावरच आधारलेली असते.

ध्यान न करता येणे म्हणजे काय असते बरे? सूर्याच्या सोनेरी किरणांकडे, घनदाट शीतल छायांकडे, चमचमत्या किंवा कोवळ्या नाजूक किसलयाकडे, जागत्या नेत्रांनी पाहता न येणे म्हणजे ध्यान न करता येणे होय. या सर्व दृश्यांकडे किती थोड्या लोकांचे लक्ष जात असते! हे जागते लक्ष म्हणजे ध्यान. ते कुणाला काहीही मिळवून देत नसते. काहीतरी मिळण्याच्या अपेक्षेने ध्यानापुढे हात जोडून कुणीही उभे राहू नये. ध्यान तुमच्या दु:खाचे निराकरण करू शकत नाही. ते केवळ एकच कार्य करते. ते तुम्हांला वास्तवाचे समृद्ध दर्शन सहजतेने घडवून देते. पण ध्यानाच्या या सहजतेचे दर्शन होण्यासाठी मन हे स्वेच्छेने, संपूर्णपणे विमुक्त होऊन गेले पाहिजे. विशिष्ट हेतूने व कारणाने मन ज्या विपुल गोष्टीचा संग्रह करीत राहते, त्या सर्वांपासून मनाला अकारण व निर्हेतुक विमुक्तता प्राप्त झाली पाहिजे. हाच ध्यानाचा मुख्य गाभा आहे. जे जे ज्ञान, जे जे अनुभव त्याच्यापासून मन पूर्ण विमुक्त होऊन जाणे म्हणजे ध्यान. ज्ञाताच्या नानाविध स्वरूपांमागे धावत सुटणे हा केवळ आत्मवंचनेचा खेळ होय. ध्याता हा जेव्हा ध्यानाचा स्वामी होऊन बसतो, तेव्हा ध्यानाची सहजता येथे राहतच नाही. ध्यात्याला हाताच्या परिमित क्षेत्रामध्येच कृती करता येत असते. म्हणून अज्ञाताचा जर उदय व्हावयाचा असेल तर ध्यात्याच्या कृतीचा संपूर्ण अंत घडून आला पाहिजे. ते अज्ञेय जसे तुम्हाला आवाहन करीत नसते, तसेच तुम्हालाही त्या अज्ञेयाला आवाहन करणे शक्य नसते. पवनलहरीप्रमाणे ते अज्ञेय केव्हाही येते व केव्हाही निघून जाते. ते कधीही धरून ठेवता येत नसते. आपल्या लाभासाठी वा उपयोगासाठी कुणालाही त्याचा संग्रह करणे शक्य नसते. उपयुक्ततेच्या दृष्टीने त्याला कसलेही मूल्य नसते. पण त्याच्यावाचून जीवन विलक्षण रितेरिते होऊन जाते. जीवनाच्या रितेपणाला मग मापच उरत नाही.

जीवनभाष्ये, खंड २, प्र. ५२

आत्मवंचनेचा प्रत्येक प्रकार

चिंतनात मन इतके विलक्षण स्पष्ट असणे अभिप्रेत असते की त्यात आत्मवंचनेचा प्रत्येक प्रकार अंत पावत असतो. आपण स्वत:ची अनंत प्रकारे कितीही मोठी फसवणूक करू शकतो; आणि तथाकथित ध्यान, चिंतन वगैरे तर आत्मसंमूढ होण्याचाच प्रकार असतो. त्यात तुमच्या संस्कारांना अनुसरूनच दर्शने, दृष्टांत वगैरे होत असतात; हे तर अगदी सरळ आहे. तुम्ही ख्रिश्चन असलात तर तुम्हाला ख्रिस्ताचा दृष्टांत होईल, तुम्ही हिंदू असलात तर तुम्हांला तुमचा कृष्ण दिसेल, किंवा तुमच्या कोट्यवधी देवतांपैकी एकाचे दर्शन होईल. पण यातील कोणतीही गोष्ट म्हणजे चिंतन नव्हे. चिंतन म्हणजे मनाची संपूर्ण स्तब्धता असते, मेंदूची संपूर्ण शांती असते. चिंतनाचा पाया रोजच्या व्यवहारातच घातला पाहिजे; आपण कसे वागतो, कसला विचार करतो तेथेच हा पाया घातला पाहिजे, एकीकडे हिंसक असावे व एकीकडे चिंतन करावे असे शक्य नाही, त्याला काही अर्थच नाही; कोणत्याही प्रकारची मानसिक भीती असली तर चिंतन हे एक पलायनच असते. मनाच्या स्तब्धतेसाठी, त्याच्या पूर्ण शांतीसाठी असाधारण शिस्त आवश्यक असते, त्या शिस्तीत दडपण, अनुकरण किंवा एखाद्या जुलमी अधिकारशाहीचे अनुयायित्व नसते; तर ती शिस्त किंवा शिकणे अहर्निश चालू असते, विचाराच्या प्रत्येक चलनवलनासंबंधी ते असते; मग मनाच्या अंगी एक धर्मशील ऐक्य भावना येत असते. तीतून असे कर्म घडू शकते, की जे विसंगत नसते.

हिंसावृत्तीच्या पलीकडे, भाग ४, प्र. २

अशी भक्ती हा आत्मवंचनेचाच एक प्रकार आहे

हे पहा, पूजन करणारा हाच स्वत:चा पूजाविषय असतो. दुसऱ्या कशाची पूजा करणे म्हणजे वस्तुत: स्वत:चीच पूजा करणे होय. प्रतिमा किंवा प्रतीक हा वस्तुत: आपल्या अहंचाच विशेष असतो. तुमची मूर्ती, तुमचा ग्रंथ किंवा तुमची प्रार्थना, ही सगळी तुमच्या संस्कारबद्ध पार्श्वभूमीचीच प्रतिबिंबे असतात. मूर्ती-प्रतीक-प्रार्थना यांची निर्मिती दुसऱ्याने केलेली असली, तरी वस्तुत: तुमच्या अहंचीच ती निर्मिती असते. कारण, तुम्ही स्वत:च्या इच्छापूर्तीच्या दृष्टीनेच पूजाविषयाची निवड करीत असता. तुमची ही निवड तुमच्या पूर्वग्रहानेच केलेली असते. तुमची देवमूर्ती ही तुमच्या आवडीनेच निर्माण केलेली नशा असते. तुमच्या स्मृतीमधूनच ही आवड शिल्पित केली जात असते. स्वत:च्या विचारांनी निर्माण केलेल्या या प्रतिमेच्या द्वारा तुम्ही वस्तुत: स्वत:चीच पूजा करीत असता. तुमची भक्ती म्हणजे तुमच्या मनाच्या मंत्रोच्चाराने झाकून टाकलेले आत्मपूजनच असते. तुमच्या पुढची देवप्रतिमा म्हणजे वस्तुत: तुम्हीच; तुमच्या मनाचेच ते प्रतिबिंब. अशी भक्ती हा आत्मवंचनेचाच एक प्रकार आहे. हा प्रकार माणसाला दु:खात, विलगतेत लोटीत असतो. याचेच नाव मृत्यू.

शोध करणे म्हणजे भक्ती करणे का असते? वस्तुत: कशाच्या तरी मागे लागणे म्हणजे शोध करणे नव्हेच. सत्य शोधू पाहणे म्हणजे सत्यापासून सदैव वंचित होऊन बसणेच होय. शोध करण्याच्या मिषाने आपण स्वत:पासून दूरदूर पळू पाहत असतो. असा शोध हा भ्रमाचाच पाठलाग असतो. आपले जे वास्तव स्वरूप असते, त्याच्यापासून दूर कुठेतरी पळून जाण्यासाठी आपण नाना प्रकारांनी सारखा प्रयत्न करीत असतो. स्वत: आपण अतिशय क्षुद्र असतो, पोकळ पोकळ असतो. त्यामुळे आपणाहून थोर वाटणाऱ्या गोष्टींची आपण जी पूजा करीत राहतो, ती पूजाही आपल्याप्रमाणेच क्षुद्र व निर्बुद्ध अशी असते. थोर गोष्टीशी सारूप्य पावण्याची ही जी प्रक्रिया असते, ते त्या क्षुद्र, क्षुल्लक गोष्टीचेच विक्षेपित रूप असते. आपला अधिकाधिकाचा हव्यास हा वस्तुत: त्या अल्पतेचा, त्या क्षुद्रतेताच विस्तार असतो. क्षुद्र किंवा अल्प हे जेव्हा थोराचा वा मोठ्याचा शोध करू लागते तेव्हा त्याच्या अल्पशक्तीच्या आवाक्यात येणारे असेच काहीतरी त्याला सापडते. स्वत:पासून दूरदूर पळण्यासाठी मनुष्य ज्या पळवाटा शोधीत राहतो, त्या विविध प्रकारच्या असतात खऱ्या. पण अशा प्रकारे पळून जात राहणारे त्याचे मन हे मात्र सदैव भीतिग्रस्तच राहत असते; ते संकुचित व निर्बुद्ध असेच राहते.

आपले मन ज्या पळवाटा शोधीत राहते, त्याचे यथार्थ आकलन करून घेणे, म्हणजेच जे ज्या वेळी जसे असेल, त्याच्यापासून मुक्त होऊन जाणे होय. आपल्या समस्येचे उत्तर शोधण्याचे जेव्हा आपण सोडून देतो, तेव्हाच आपल्या वास्तव स्वरूपाचे आपणांस यथार्थ आकलन होऊ शकते. आपल्यापुढील समस्येचे उत्तर शोधीत राहणे, ही स्वत:च्या वास्तव स्वरूपापासून दूरदूर जाण्यासाठी शोधलेली पळवाट असते. शोध करीत राहण्याचा हा प्रकार विविध नावांनी ओळखला जात असतो. भक्ती हे यापैकीच एक नाव आहे. पण वास्तव काय आहे, याचे जर यथार्थ आकलन करून घ्यायचे असेल, तर त्यासाठी मन शांत, नि:स्तब्ध झाले पाहिजे.

जीवनभाष्ये, खंड २, प्र. १०

मराठी संमेलन २०१६ - सह्याद्री

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया द्वारे सह्याद्री येथील कृष्णमूर्ती अध्ययन केंद्रात १५-१७ ऑक्टोबर, २०१६ या दरम्यान मराठी संमेलन आयोजित करण्यात आले होते. 'जे. कृष्णमूर्तींचे शिक्षण-विचार आणि आजचे जग' असा या संमेलनाचा चिंतन-विषय होता.

या संमेलनात प्रसिद्ध लेखक आणि शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते श्री. हेरंब कुलकर्णी, डॉक्टर परचुरे (कृष्णमूर्तींचे वैयक्तिक डॉक्टर), सह्याद्री शिक्षण केंद्राचे डायरेक्टर डॉ. शैलेश शिराळी आणि श्री. विनय दाभोळकर यांनी कृष्णमूर्तींचे शिक्षणविषयक विचार आणि तत्वज्ञान यांचा उहापोह करत मार्गदर्शन केले.

श्रीमती वासंती पडते यांनी आपल्या प्रास्ताविकात सध्याच्या सामाजिक स्थितीला आपली शिक्षणपद्धती कशी जबाबदार आहे याबद्दल विवेचन केलं. भ्रष्टाचार, आतंकवाद ही या शिक्षणपद्धतीचीच निष्पत्ती आहे, हे एक कठोर सत्य आहे; अभ्यासक्रम बदलण्यासारखे वरवरचे उपाय करण्यापेक्षा शिक्षणपद्धतीमध्ये आमूलाग्र परिवर्तन होणं हेच या परिस्थितीला उत्तर आहे. शिक्षकांनी सखोल विचारमंथन करून या प्रश्नांकडे वेगळ्या दृष्टीने पाहिलं पाहिजे, मुलांमधील संवेदनशीलता जागृत करण्याला प्राध्यान्य दिलं पाहिजे असं वासंतीताईंनी आवर्जून सांगितलं.

शिक्षणाची गुणवत्ता हा असमाधानाचा विषय आहे, शाळा आहेत पण शिक्षण नाही, अशी सुरुवात करत श्री. हेरंब कुलकर्णी म्हणाले की शिक्षण हा अर्थकारण, राज्यकारण आणि धर्मकारणाचा आरसा आहे. शिक्षणव्यवस्था हे साधन आहे. अर्थव्यवस्थेला जशा प्रकारची माणसं लागतात तशा प्रकारची व्यवस्था शाळांतून केली जाते हे त्यांनी महाराष्ट्रातील शाळांच्या संगणकांच्या संख्येवरून दर्शवून दिलं.

'विचार कसा करावा' हे शिकवणारं शिक्षण हवं, मात्र आजचं शिक्षण हे 'विचार न करू देणारं' आहे असंही ते म्हणाले. Specialization देणारं हे आजचं शिक्षण मात्र सर्वांगीण विकास घडवण्यास सक्षम नाही, असंही त्यांनी सांगितलं. दुदैवाने पालकांनाही मुलांना फक्त उत्तम व्यवसाय देणारं शिक्षण हवं आहे, असं ते खेदाने म्हणाले. आजची अर्थव्यवस्था ही जास्तीत जास्त उपभोग घ्यायला उद्युक्त करणारी आणि त्यायोगे फक्त GDP(सकल घरगुती उत्पादकता) वाढवणारी आहे.

या सगळ्या भयावह पार्श्वभूमीवर, कृष्णमूर्तींचे शिक्षणविषयक विचार त्यांनी मांडले. ते म्हणाले की कृष्णमूर्ती आपल्याला विचार करायला भाग पाडतात, प्रचंड संवेदनाशील बनवतात. कृष्णमूर्तींच्या शाळांतील मुले आणि शिक्षकांचे खेळीमेळीचे, स्वामित्वाची भावना नसलेले, समानतेचे, निसर्गाच्या सहवासात शिकण्याचे आणि शिकवण्याचे हृद्य नाते ही सगळ्यात मोलाची गोष्ट आहे, हे त्यांनी सोदाहरण दाखवून दिले.

२०१० सालच्या 'Right to Education' या कायद्या अंतर्गत, मुलांच्या शिक्षेवर बंदी आणि आठवी पर्यंत परीक्षा न घेण्याचा शासनाचा निर्णय हा कृष्णामूर्तींच्या विचारांचा विजय आहे, असंही ते म्हणाले.

शिक्षकांचं व्यक्तिमत्व हे अहिंसक, पारदर्शक आणि प्रेमळ असलं पाहिजे आणि ते कृष्णमूर्तींच्या शाळांमधून त्यांनी पाहिलं आहे. कृष्णमूर्तींचे विचार, तत्वज्ञान हे शाळेत वाचले जात नाहीत तर ते प्रत्यक्षात उतरवले जातात. बहुतांश शिक्षक योग्य रीतीने आपली कामं करत नाहीत हे खरं असलं तरी त्यांना मार्गदर्शन नाही, हेही तितकंच खरं आहे असं ते म्हणाले. त्यासाठी शिक्षकांना कृष्णमूर्तींचे विचार आणि शाळांतील अनेक उपक्रमांची माहिती द्यावी. त्यामुळे अनेक चांगले बदल घडून येतील.

मुलांमधे प्रेम, उत्कटता, संवेदनशीलता, विचार करण्याची क्षमता यायला हवी असेल तर पालकांशीही संवाद साधणं गरजेचं आहे. आजच्या पालकांची मानसिकता फार भयानक आहे. अनेक पालकांना मुलांचं मुक्त असणं, त्यांना निवांतपण, मोकळा वेळ देणं हे मान्यच नाही. त्या पालकांना सचिन तेंडुलकरपासून अनेक महापुरुष आपल्या पाल्यात असावे असं वाटत असल्याने तेच मुलांच्या हत्या करत असतात, असं त्यांनी खूप खेदाने सांगितले. म्हणूनच शिक्षणावर काम करत असताना पालकांशी संवाद साधणं खूपच आवश्यक आहे असंही ते म्हणाले.

शिक्षण व्यवस्था ही क्रांतीसारखी एकदम बदलत नाही. ती हळूहळू बदलणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे, त्यात हस्तक्षेप करून, कृष्णमूर्तींचे शिक्षण-विचार शासन, शिक्षक, पालक यांच्यापर्यंत पोहोचवले पाहिजेत की जेणेकरून शिक्षणात आणि त्याद्वारे समाजात आमूलाग्र बदल घडून येईल. युद्धविरोधी, धर्मनिरपेक्ष, 'विचार करायला शिकवणारं', संवेदनक्षम मन तयार करणारं आणि जबाबदार व्यक्तिमत्व तयार करणारं शिक्षण संवादातून करणं सहज शक्य आहे असंही श्री. हेरंब कुलकर्णी म्हणाले.

अनेक वर्षे कृष्णमूर्तींच्या सहवासात राहिलेले ८८ वर्षांचे डॉक्टर परचुरे हे या संमेलनातील सगळ्यात तरुण, हसरं, उत्कट आणि उस्फुर्त व्यक्तिमत्व होतं. कृष्णमूर्तींची शिकवण आत्मसात करणं याचा अर्थ त्यांच्या दृष्टीने काय आहे याविषयी ते बोलले. शून्यता आणि एकात्मता हा कृष्णमूर्तींच्या शिकवणूकीचा गाभा आहे असं त्यांना वाटतं.

डॉक्टर या नात्याने वार्ध्यक्याकडे झुकलेल्या व्यक्तिचं मन व मेंदू कसे कार्य करतात यावर त्यांनी भाष्य केलं. सतत भूतकाळाचा विचार करत राहिल्यामुळे मन कसं बुद्धीची झीज करतं आणि त्यामुळे वार्धक्यामध्ये बुद्धीचा कसा ऱ्हास होतो (senile degeneration) हे त्यांनी उदाहरण देऊन सांगितलं. ते म्हणतात, भूतकाळाला जेव्हा वर्तमानकाळात सतत आणलं जातं तेव्हा त्यात निर्माण झालेली सुखदु:ख पुन्हापुन्हा वर येत रहातात आणि त्यातूनच अनेक मानसिक व शारिरीक व्याधी जडतात. या अवस्थेला रोखण्यासाठी काय करायला हवं, याची जाणीव रोग्यांना कशी करून देता येईल याविषयी ते तळमळीने बोलले.

कृष्णमूर्तींची शिकवण आत्मसात करण्यासाठी आंतरिक इच्छा आणि उत्कटता या दोहोंची नितांत आवश्यकता आहे असं त्यांना वाटतं. आणि या दोन्ही गोष्टी कायम टिकवायच्या असतील तर आपण नेहमी जागरूक असलं पाहिजे असंही ते म्हणाले.

जीवन जगताना आणि विचार करताना आपण सतत 'निवड' करत असतो, प्रत्येक गोष्टीचं मूल्यमापन करत असतो. आणि हे करत असताना आपल्या मनामध्ये चूक किंवा बरोबर असं काहीतरी मूल्य असतं. हे मूल्य आपल्या परंपरांमधून, संस्कारातून आलेलं असतं. परंतु एखाद्या गोष्टीवर टीका करताना त्याच्या मागे कोणतं मूल्य आहे हे जर आपल्याला शोधून काढता आलं तर ती फार मोठी गोष्ट होईल असं ते म्हणाले. त्यामुळे तुम्ही निवड करणं संपवून निवड केवळ बघणं किंवा पाहणं या अवस्थेपर्यंत सहज जाऊ शकाल आणि तेव्हा तुम्ही कृष्णमूर्ती म्हणतात त्या शब्दातीत, कालातीत अवस्थेत गेलेले असाल असंही ते म्हणाले.

डॉक्टर शैलेश शिराळी हे जवळजवळ ४० वर्षे कृष्णमूर्तींच्या शिकवणूकीचे अभ्यासक आहेत आणि अनेक वर्षे त्यांनी कृष्णमूर्तींच्या शाळांमध्ये काम केलं आहे. त्यांनीही कृष्णमूर्तींचे शिक्षणविषयक विचारच आजच्या जगातील भीषण प्रश्न सोडवण्यास कसे सक्षम आणि गरजेचे आहेत हे अनेक उदाहरणं देऊन समजावून दिलं.

श्री. विनय दाभोळकर यांनी 'जीवन – एक स्पर्धा की प्रवास?' या विषयावर आपले विचार मांडले. आपल्या स्वत:मध्ये स्पर्धेची भावना नसली तरीही जीवनात पदोपदी स्पर्धात्मक प्रश्नांना कसं तोंड द्यावं लागतं ते सांगत त्यांनी दोन रूपकांच्या द्वारे स्पर्धेने झपाटलेली एक उच्चशिक्षित व्यक्ती आणि त्याउलट प्रत्येक दिवशी उभी राहणारी आव्हानं मोकळ्या मनाने स्वीकारणारा एक ट्रक ड्रायव्हर यांच्या मनोव्यापारातील फरक दाखवून दिला.

सकारात्मक आणि नकारात्मक विचारांबरोबर 'चकारात्मक' (अमुक गोष्ट साध्य झालीच पाहिजे याचा अट्टहास) विचारांची संकल्पना मांडून श्री. विनयनी एक गृहीतक आपल्या पुढे ठेवलं की, प्रत्येक असमाधानाच्या बाबीमागे एक तरी चकारात्मक विचार दडलेला असतो.

कृष्णमूर्तींनी सांगितल्याप्रमाणे आपण असमाधानाचे निखारे धगधगत ठेवत त्या वास्तवाचं निरीक्षण केलं पाहिजे, हे स्पष्ट करताना श्री. विनयनी 'जीवनभाष्ये' या कृष्णजींच्या पुस्तकातील उदाहरणांवर चर्चा केली. असमाधानाच्या निखाऱ्यांवर आपण धूळ फेकत राहतो आणि समाधानाच्या दिशेने आपल्याला वाटचाल करायची असते, पटकन समाधान कशाने होईल ते आपण शोधत असतो. खरं तर दिसणं म्हणजे जगणं असतं, कृती असते, वागणं असतं हे सत्य कृष्णजींनी वारंवार आपल्यापुढे ठेवलं आहे. भाषणानंतर प्रश्नोत्तरांमधून श्री विनयनी श्रोत्यांबरोबर संवाद साधला.

गॅदरिंगच्या दुसऱ्या दिवशी संध्याकाळी शास्त्रीय संगीत सभेचे आयोजन करण्यात आले होते. श्रीमती सौम्या उल्लाल-कंटक यांच्या दोन तासाच्या गायनाने सर्वांना मंत्रमुग्ध केलं. सह्याद्री स्कूलच्या प्रशांत वातावरणात शास्त्रीय संगीत ऐकणं हा एक आगळा अनुभव होता.

या दोन दिवसात कृष्णमूर्तींच्या भाषणाचे आणि संवादांचे व्हिडीओ दाखवण्यात आले. त्याचप्रमाणे The Challenge of Change या कृष्णमूर्तींवर बनवलेल्या चित्रपटाचा मराठी रूपांतरणातील काही भाग दाखवण्यात आला. कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीचं, तत्वज्ञानाचं ,विचारांचं सखोल आकलन व्हावं या दृष्टीने गटचर्चा व परिसंवादाचं आयोजनही करण्यात आलं होतं. सध्याच्या गुंतागुंतीच्या, संभ्रमित आणि हिंसेने पछाडलेल्या जगात शिक्षणातून आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी विविध मार्ग, विचार आणि उपक्रम शोधणं याविषयी चिंतन केलं गेलं.

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, वसंतविहार, १२४, १२६, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८. • दूरध्वनी: ०४४०-२४९३७८०३/२४९३७५९६ • ईमेल: info@kfionline.org • वेबसाईट: www.kfionline.org • कृष्णमूर्तींच्या भाषणांच्या आणि संवादांच्या अनेक डिव्हिडीज् आता आपण ऑर्डर पाठवून मागवू शकता. ही यादी वेबसाईटवर उपलब्ध आहे. • दर महिन्याच्या तिसऱ्या शुक्रवारपासून रविवार संध्याकाळपर्यंत निवासी अध्ययन शिबीरे आयोजित केली जातात.

कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बेंगलुरू: संपर्क: द स्टडी, व्हॅली स्कूल कँपस, १७ कि.मी. कनकपुरा रोड, थातगुणी पोस्ट, बेंगलुरू-५६००६२.
दूरध्वनी: ०८० – २८४३५२४३ • ईमेल: kfistudy@gmail.com • वेबसाईट: www.kfistudy.org
०५-०८ जानेवारी २०१७ Exploring Anxiety, Stress & Inner Conflict ०९-१२ फेब्रुवारी २०१७ Silence, Stillness, & Meditation
०९-१२ मार्च २०१७ What does 'FEAR' do to you?
०६-०९ एप्रिल २०१६ Karnataka JK Adhayana Shibra: Understanding Relationship

कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, राजघाट- वाराणसी: कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, राजघाट फोर्ट, वाराणसी २२१ ००१.
दूरध्वनी: ०५४२ – २४४१२८९ / २४४०३२६ • ईमेल: kcentrevns@gmail.com • वेबसाईट: www.j-krishnamurti.org

कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री: पोस्ट – तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा – पुणे, पिन – ४१०५१३, महाराष्ट्र
दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २०३४७५ • ईमेल : kfisahyadri.study@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, ऋषी व्हॅली: जिल्हा चित्तूर, आंध्र प्रदेश – ५१७३५२
दूरध्वनी : (०८५७१) २८०३७/६८६२२/६८५८२ • ईमेल: study@rishivalley.org • वेबसाईट : http://www.rishivalley.org

कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, उत्तरकाशी: पोस्ट रानारी, डुंडा ब्लॉक, जिल्हा उत्तरकाशी – २४९१५१. • ईमेल: krc.himalay@gmail.com
दूरध्वनी : ९४१२४ ३६४२९/९४१५९८३६९० • वेबसाईट : http://www.jkrishnamurtionline.org भारतीय भाषांमधील संकेतस्थळ

कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कोलकाता: कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, ३०, देवदार स्ट्रीट, कोलकाता – ७०००१९.
दूरध्वनी : (०३३) ४००८२३९८ • ईमेल: kfikolkata@gmail.com

कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कटक: ओरिसा, पुरीघाट रोड, तेलेंगा बझार, कटक – ७५३००९, ओरिसा.
दूरध्वनी : (०६७१) ६४१७९९० • ईमेल: kficuttackcentre@gmail.com • वेबसाईट : www.kficc.org

कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर: आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहाटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे, पिनकोड- ४२१५०३. दूरध्वनी: (०२२) २६६००२२४, २४२२३१९९ • ई मेल: jksesbadlapur@gmail.com • वेबसाईट : www.jkses.org
वार्षिक संमेलन : १२ फेब्रुवारी २०१७, सकाळी १० ते संध्याकाळी ४ पर्यंत

आत्म-वंचना

आपले मन भ्रांती निर्माण करून त्यात स्वतः कसे रममाण होते व ते आपले भ्रम स्वतःवर व इतरांवर कसे लादते, याविषयी, म्हणजेच, आपणच आपली फसवणूक कशी करीत असतो त्याविषयी विचारविमर्श करावा असे मला वाटते. सध्याच्या जागतिक पातळीवरील आपल्या अटीतटीच्या बिकट प्रसंगी तर हा प्रश्न अत्यंत गंभीर झाला आहे. परंतु आत्मवंचनेच्या या संपूर्ण समस्येचे आकलन होण्यासाठी आपण त्या समस्येच्या केवळ शाब्दिक पातळीवर मागोवा घेऊन भागणार नाही, तर आपण अधिक खोलवर, मूलगामी आंतरिक शोध घेतला पाहिजे. आपण शब्दांनी व प्रतिशब्दांनी फार लवकर समाधान मानतो. आपण केवळ व्यवहारात शहाणे असतो व व्यवहार-चतुर असल्यामुळे, काहीतरी चांगले घडेल अशी फक्त आशा बाळगून असतो. युद्धाचे स्पष्टीकरण केल्याने युद्ध थांबत नाही हे आपण जाणतो; युद्धाचे स्वरूप काय व ते कसे उद्भवते वगैरे स्पष्टीकरणे देणारे इतिहासकार; दैववादी व धार्मिक लोक पुष्कळ आहेत, तरीही युद्धे आपली चालूच आहेत; त्यांचे स्वरूपही पूर्वीपेक्षा जास्त विनाशक झाले आहे. आपल्यापैकी जे खरोखर कळकळीचे असतील त्यांनी शब्दांच्या पलीकडे गेले पाहिजे आणि आपणातच पूर्ण आंतरिक क्रांती घडवून आणली पाहिजे. संपूर्ण मानवजातीचे मूलभूत परिवर्तन कायम स्वरूपी करण्याचा तोच एकमेव उपाय आहे.

त्याचप्रमाणे अशा प्रकारच्या आत्मवंचनेवर चर्चा करीत असता आपण उथळ शाब्दिक स्पष्टीकरणांनी व हजरजबाबीपणे उत्तर देणे, यापासून सावध राहिले पाहिजे. मला असे सुचवावेसे वाटते की वक्ता बोलत आहे ते नुसते ऐकून न थांबता आपल्या जीवनाला तो प्रश्न लागू करून आपले विचार व कर्मे कशी आहेत, आपल्या दुसऱ्यावर काय परिणाम होतो, तसेच आपली सर्व कार्ये स्वार्थाने कशी होतात ते निरीक्षण करून पाहिले पाहिजे.

आत्मवंचनेचे कारण काय? त्याला कशाचा आधार असतो? आपण स्वतःची फसवणूक करतो याचे भान किती लोकांना असते? ''आत्मवंचना म्हणजे काय व ती कशी उत्पन्न होते?'' - या प्रश्नाला उत्तर देण्यापूर्वी आपण स्वतःच आत्मवंचना करीत असतो याचे भान आपल्याला हवे की नाही? आपणच आपल्याला फसवतो हे आपल्या लक्षात येते का? आणि तसे करण्यात आपला मतलब तरी काय आहे? मला वाटते, की हे पाहाणे फार महत्त्वाचे आहे, कारण आपण स्वतःची जेवढी जास्त फसवणूक करू तेवढी तिची शक्ती वाढतच जाते. कारण आपली फसवणूक दुसऱ्यावरही आपण लादावी असा अभिनिवेश, अशी शक्ती व असे सामर्थ्य तीमधूनच आपल्या अंगी येत असते. मग हळुहळू आपण आपले भ्रम स्वतःवर, तसेच दुसऱ्यांवरही लादू लागतो. आत्मवंचनेची ही प्रक्रिया मोठी गमतीदार असते. आपल्याला तिची जाणीव आहे काय? आपण मोठे स्पष्ट, सुसंगत व सरळ विचार करू शकतो असा आपला समज असतो, पण विचारांच्या या प्रक्रियेत आत्मवंचना असते हे आपण जाणतो का?

विचार हीच मुळात शोध घेण्याची, समर्थन, सुरक्षितता, आत्मसंरक्षण यांचा मागोवा घेण्याची; मानमान्यता, अधिकारपद, प्रतिष्ठा आणि सत्ता यांच्या इच्छा बाळगणारी प्रक्रिया नाही काय? राजकीय किंवा धार्मिक व सामाजिक मोठेपणा मिळविण्याची वासनाच मुळात आत्मवंचनेचे कारण नाही काय? मी ज्या क्षणी फक्त भौतिक गरजांपेक्षा काहीतरी जास्त मागू लागतो, त्या वेळी माझ्या मनाची अवस्था काहीही मान्य करण्याची, पटवून घेण्याची तयारी असणारी अशी मी स्वतःच बनवीत नाही काय? आता हेच उदाहरण घ्या. मरणोत्तर काय होते हे जाणण्याची उत्कंठा आपल्यापैकी पुष्कळांना असते, आणि आपले वय जास्त असेल तेवढी जिज्ञासा जास्त असते. त्यातील सत्य जाणण्याची आपल्याला इच्छा असते. पण आपल्याला ते कसे समजेल? वाचनाने किंवा स्पष्टीकरणे देऊन तर ते नक्कीच समजणार नाही.

तुम्ही ते कसे शोधून काढाल? पहिल्या प्रथम, त्या शोधाच्या आड येणारा प्रत्येक घटक तुम्ही तुमच्या मनातून काढून टाकला पाहिजे. मृत्यूनंतरही आपण असावे किंवा तेथे काय असेल, ते जाणावे याची इच्छा काढून टाकली पाहिजे. कारण मनाला नेहमी सुरक्षितता हवी असते, आहे ते चालू राहायला हवे असते, आणि आपल्या आशा-आकांक्षांची पूर्ती करण्याचे साधन म्हणून भविष्यकाळीही स्वतःचे अस्तित्व हवे असते. असे मन जरी मरणोत्तर जीवनाचे अस्तित्व, पुनर्जन्म किंवा जे काही असेल ते शोधून त्यातील सत्य हुडकून काढू इच्छीत असेल, तरीही तसा शोध घेण्यास असमर्थ असते, होय की नाही? पुनर्जन्म खरोखरी असतो की नाही हे महत्त्वाचे नसून, एखादी वस्तुस्थिती असेल किंवा नसेल याबाबत मन स्वतःची फसगत करून घेऊन समर्थन कसे करीत असते हे पाहाणेच महत्त्वाचे असते. तुम्ही समस्येला सामोरे कसे जाता, त्यात तुमचे हेतू काय, प्रेरणा कोणत्या, इच्छा कोणत्या, हे पाहाणेच महत्त्वाचे असते.

साधक हा स्वतःच आपल्याला भ्रम लादून घेत असतो. दुसरा कोणीही त्याला भ्रमात पाडीत नसतो; तो स्वतःच भ्रमात पडतो. आपण स्वतःच भ्रम निर्माण करतो व त्याचे गुलाम होतो. इहलोकी किंवा परलोकी काहीतरी होण्याची सततची इच्छा हाच आत्मवंचनेचा पायाभूत घटक असतो. त्यापैकी इहलोकी आपण कोणीतरी होण्याचा हव्यास धरण्याचा काय परिणाम होतो ते आपल्याला माहीतच आहे; सर्वत्र माजलेला गोंधळ, परस्परांशी चढाओढ, शांतीच्या नावाखाली केला जाणारा परस्परांचा नाश! परस्परांना आपण कसे खेळवीत असतो व फसवीत असतो, ते तुम्ही जाणताच. तो तर आत्मवंचनेचा फारच विलक्षण प्रकार असतो. आणि इहलोकाप्रमाणेच परलोकातही आपल्याला सुरक्षितपणा व कोणते तरी स्वतःचे असे स्थान हवे असते.

म्हणजेच, स्वतः कोणीतरी असावे, बनावे, किंवा काहीतरी हस्तगत करावे ही ऊर्मी ज्या क्षणी उत्पन्न होते, त्याच क्षणी आपण स्वतःला फसविण्यास सुरुवात करतो. त्यापासून सुटणे मनाला कठीण जाते. जीवनाच्या मूलभूत समस्यांपैकीच ही एक समस्या आहे. या जगात राहूनही आपण म्हणजे कोणीच नाही, अशा रीतीने जगणे शक्य आहे का? त्याचवेळी सर्व वंचनेपासून मुक्ती असेल, कारण त्याच वेळी मन फलाची अपेक्षा धरीत नसते, मन समाधानकारक उत्तराची अपेक्षा करीत नसते, मन कोणत्याही प्रकारच्या समर्थनाची इच्छा करीत नसते, मन कोणत्याही प्रकारच्या परस्पर संबंधातून कोणत्याही स्वरूपात सुरक्षितता शोधीत नसते. मन जेव्हा वंचनेने बारकावे आणि किती प्रकारे फसवणूक होऊ शकते हे पक्के ओळखते, आणि चांगले ओळखून प्रत्येक प्रकारचे समर्थन, आधार, सुरक्षितता, यांचा त्याग करते- तेव्हाच अगदी कोणीही नसण्याचे सामर्थ्य मनाला असते- असे होणे शक्य आहे का?

जोपर्यंत आपण कोणत्याही प्रकारे स्वतःची फसवणूक करू तोपर्यंत प्रीती अस्तित्वात येऊ शकणार नाही. जोपर्यंत मन स्वतःच भ्रम निर्माण करून स्वतःवर त्याचा पगडा बसू देते तोपर्यंत ते साहजिकच

समष्टिरूप बोधापासून किंवा एकात्म बोधापासून स्वतःला वेगळे पाडते. ती आपली एक अडचण असते. आपल्याला कसे सहकार्य करावे ते माहीत नसते. आपल्याला जे माहीत आहे ते एवढेच की आपणच दोघांनी ठरविलेल्या विशिष्ट ध्येयाकडे जाण्यासाठी आपण एकत्र कार्य करण्याचा प्रयत्न करतो. जोपर्यंत विचाराने निर्माण केलेले एखादे समान ध्येय आपल्याला नसेल, तेव्हाच तुम्ही व मी सहकार्य करू शकतो. आपण स्वतः कोणीही होण्याची जेव्हा इच्छाच करीत नाही, तेव्हाच सहकार्य शक्य होते, हे ओळखणेच जास्त महत्त्वाचे आहे. जेव्हा तुम्ही व मी आपापल्या परीने कोणीतरी होण्याची इच्छा करतो तेव्हा श्रद्धा वगैरेंची जरूरी पडते, एखादी स्वतःच प्रक्षेप केलेली अत्यंत सुखी जीवनाची क्षितिजे आवश्यक होतात. पण तुम्ही व मी जर अनामिकपणे, 'मी'ची भाषाच न उपजता, कोणत्याही अल्पवंचनेशिवाय, श्रद्धाविषय व ज्ञान यांचे कोणतेही अडथळे न येता, सुरक्षितपणाची एकही इच्छा न करता, नवनिर्मिती करत असतो, तेव्हाच खरे सहकार्य अस्तित्वात येते.

कोणतेही ईप्सित दृष्टिपथात नसूनही सहकार्य करणे, एकत्र येणे हे आपल्याला शक्य आहे का ? परिणाम घडवून आणण्याची आशा न बाळगता तुम्ही व मी एकत्र काम करू शकतो काय? तेच तर खरे सहकार्य असते, होय की नाही? तुम्ही व मी विचार करून, योजना ठरवून विशिष्ट उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवले व त्या दिशेने एकत्र काम करण्यास प्रारंभ केला तर त्यात कोणती प्रक्रिया असते? त्यात अर्थातच आपले विचार म्हणजेच मनाचा केवळ बौद्धिक भाग परस्परांशी मिळतो आणि भावनात्मक दृष्टीने मात्र आपले सारे अस्तित्व त्याविरुद्ध बंड करून उठत असते आणि त्यात आत्मवंचना येते, आणि तुम्ही व मी यांमध्ये संघर्ष निर्माण होतो. ही तर आपल्या रोजच्या व्यवहारात स्पष्ट दिसणारी गोष्ट आहे. तुम्ही व मी एखादे काम बौद्धिक पातळीवर एकत्रितपणे करण्याचे मान्य करतो, पण नकळत, आतून मात्र तुमच्यामाझ्यात झगडा चालूच असतो. मला माझे समाधान करणारे फल हवे असते; मला वरचढ व्हावेसे वाटते, तुमच्या पुढे माझे नाव वरच्या श्रेणीवर असावेसे मला वाटते; पण बाह्यतः मात्र मी तुमच्याबरोबर काम करतो असेच सारे समजतात. म्हणूनच ती योजना निर्माण करणारे आपण दोघेही वरवर पाहाता त्या योजनेच्या संदर्भात सहमत असलो तरीही परस्परांना विरोधच करीत असतो.

तुम्ही व मी कोणीच नाही या भूमिकेतून या जगात तुम्ही व मी एकत्र मिळून परस्पर सहकार्य करू शकतो की नाही हे पाहणे महत्त्वाचे नाही का ? आपण केवळ उथळ स्तरावरच नव्हे, तर मूलतः खरोखरी प्रामाणिकपणे सहकार्य करणे शक्य आहे का? हाच प्रश्न महत्त्वाच्या प्रश्नांपैकी एक आहे, कदाचित एकमेव महत्त्वाचा आहे. मी एका उद्दिष्टाशी एकरूप झालेला असतो व तुम्हीही त्याच उद्दिष्टाशी एकरूप झालेले असता. आपण दोघेही त्या उद्दिष्टांच्या बाबतीत कळकळ बाळगतो, ते प्रत्यक्षात आणण्याचा आपल्या दोघांचाही मानस असतो. ही विचारप्रक्रिया खरोखरी उथळ आहे, कारण ममत्वाने आपले कशाशी तरी सारूप्य मानण्यातून आपण अलगपणा निर्माण करीत असतो, हे रोजच्या जीवनात अगदी उघड दिसते. तुम्ही हिंदु असलात तर मी कॅथॉलिक असतो आणि आपण दोघेही बंधुत्वाचा उपदेश करीत असतो व तरीही आपण परस्परांचा गळा घोटण्यास कचरत नाही, असे का? ही पण आपली एक समस्या आहे, नाही का ? नकळत, मनात माझ्या काही खोलवर श्रद्धा असतात, आणि तुमच्यातही असतात. नुसत्या बंधुभावाच्या गोष्टी बोलून आपण श्रद्धांचा एकूण प्रश्न सोडविलेला नाही, फक्त तात्त्विक व बौद्धिक दृष्टीने, अमुक एक असे असावे असे मान्य केलेले आहे. आतून अगदी खोलातून आपण एकमेकांविरुद्ध असतो.

आपली फसवणूक करणारे आणि त्यातूनच आपल्याला एक प्रकारचा अभिनिवेश देणारे हे अडथळे आपण काढून टाकीत नाही, तोवर तुमच्या माझ्यात सहकार्य असणे शक्य नाही. आपण एखाद्या गटाशी, एखाद्या कल्पनेशी, किंवा विशिष्ट देशाशी ममत्वाने बांधलेले राहून आपण सहकार्य करू शकत नाही.

श्रद्धेने, समजुतींनी सहकार्य उत्पन्न होत नाही; उलट श्रद्धा, विश्वास हे भेद पाडणारेच असतात. म्हणूनच राजकीय पक्षांमध्ये, प्रत्येकाचा आर्थिक प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत आपापला वेगळा दृष्टीकोन ठेवून, प्रत्येक पक्ष दुसऱ्या पक्षाविरुद्ध झगडत असतो. उदाहरणार्थ उपासमारीचा प्रश्न सोडविण्याबाबत सुद्धा त्यांचे एकमत नसते; तो प्रश्न सोडविण्यास उपयोगी पडणाऱ्या सिद्धांताविषयीच त्यांना आस्था असते. तो प्रश्न प्रत्यक्षात कसा सोडवावा याची त्यांना चिंता नसते, तर त्याच्या पद्धतीविषयी चिंता असते. म्हणून दोन्ही पक्षांत स्वमताचा आग्रह असतो. कारण त्यांना प्रश्नाचे महत्त्व न वाटता, कल्पनेचे महत्त्व वाटते. त्याचप्रमाणे धार्मिक लोक; चैतन्य एकच आहे, ईश्वर एकच आहे असे ते तोंडाने म्हणतात, तरी ते एकमेकांविरुद्ध असतात, हे तर तुम्हाला माहीतच आहे. त्यांच्या श्रद्धा, मते, अनुभव हे आतून त्यांचा नाश करीत असतात आणि त्यांना वेगळे करीत असतात.

अनुभव हा आपल्या मानवी संबंधामध्ये भेद पाडणारा एक घटक होतो, अनुभव हा एक वंचनेचा मार्ग आहे. मला एखाद्या गोष्टीचा अनुभव आला असेल तर मी त्याला चिकटून राहातो. अनुभव घेण्याची प्रक्रिया काय असते याची तपासणीच मी करीत नाही. मला आलेला अनुभवच पुरेसा मानून मी त्याला चिकटून राहातो, आणि अशा तऱ्हेने मी त्या अनुभवाच्या द्वारा स्वतःची फसवणूक करीत असतो.

आपली अडचण अशी आहे की, एखाद्या विशिष्ट श्रद्धेला, समजुतीला आपण एवढे कवटाळून बसतो, तिच्याशी सारूप्य पावतो, किंवा जीवन सुखी करण्याच्या, किंवा आर्थिक तडजोडी करण्याच्या विशिष्ट पद्धतीच्या इतके आहारी जातो की याच गोष्टींच्या ताब्यात आपले मन सापडते व आपण प्रश्नाचे रहस्य समजू शकत नाही. म्हणून, आपले अनुभव, श्रद्धा व आचरण यांच्या माध्यमातून व्यक्तिशः आपण अलिप्त राहू इच्छितो. ह्या गोष्टींचे नीट आकलन करून – केवळ उथळ स्तरावर नव्हे तर, अगदी खोल स्तरावरसुद्धा – त्यांचा आपण जोपर्यंत निरास करीत नाही तोपर्यंत जगात शांतता येणे अशक्य आहे. म्हणूनच आपल्यापैकी जे खरोखरी कळकळीचे आहेत त्यांनी, स्वतः कोणीतरी होण्याच्या, ध्येय गाठण्याच्या, फायदा मिळविण्याच्या इच्छांचा, केवळ वरवरच नव्हे तर आमूलाग्रपणे व सखोलपणे, पूर्ण बोध करून घेतला पाहिजे, त्याशिवाय जागतिक शांतता अस्तित्वात येणे शक्य नाही.

सत्य ही हस्तगत करण्याची वस्तू नसते. प्रीती बाळगून ठेवू किंवा तिच्याशी नाते जोडू अशी इच्छा करणाऱ्यांच्या वाटेला प्रीती वळत नाही. खरोखर मन जेव्हा काहीही शोधीत नसते, पूर्णपणे शांत असते, तसेच आत्मवंचनेचा दर्शक आवेश उत्पन्न करणाऱ्या आणि मनाला स्वतःवर अवलंबून राहायला लावणाऱ्या कोणत्याही चळवळी किंवा श्रद्धाही ते जेव्हा उभारीत नसते, तेव्हाच अशा गोष्टी अस्तित्वात येतात. आणि जेव्हा मनाला वासनांची सारी हालचाल समजून येते, तेव्हाच फक्त ते स्तब्ध होऊ शकते. फक्त तेव्हाच आपण कोणीतरी असावे किंवा असू नये अशी हालचाल मन करीत नाही; फक्त तेव्हाच कसलीही फसवणूक होऊ शकणार नाही अशी अवस्था शक्य असते.

प्रथम अर्थात् अंतिम मुक्ती

वार्षिक संमेलन २०१६ - ऋषी व्हॅली

कृष्णमूर्ती फाउंडेशनचे वार्षिक संमेलन या वर्षी नोव्हेंबर २० ते २३ या दिवसात ऋषी व्हॅली येथे भरले होते. संमेलनाचा विषय होता ‘आजच्या जगात जबाबदारीने जगणे.’ जवळ जवळ २५० अभ्यासक या संमेलनामध्ये सहभागी झाले होते.

संमेलनाच्या सुरुवातीला आपल्या प्रास्ताविकात फाउंडेशनचे सेक्रेटरी श्री कंदास्वामी यांनी कृष्णजींचे विचार उद्धृत करताना सांगितलं की, जागतिक समस्यांचं मूळ कशात आहे हे आपल्याला अजूनही कळलेलं नाही म्हणूनच आपला प्रतिसाद क्षीण असतो – निष्फळ ठरतो. सामान्यत:, जगातल्या समस्यांना आपण जबाबदार नाही असंच आपण गृहीत धरतो, त्यामुळे ह्या समस्यांना तोंड देण्याची जबाबदारी शासनाची, राजकीय नेत्यांची आणि विचारवंतांची आहे अशी आपली भूमिका असते. समस्यांचा पुरेसा अभ्यास न करताच, त्यांची उकल करण्याची पुरेशी क्षमता आपल्यामध्ये नाही, असा समज करून घेतल्यामुळे आपण कर्म (समस्येचा स्वीकार आणि त्याबरोबरच ती सोडवण्यासाठी काही करण्याची तयारी नसणं) आणि कृपा (दैवी संकेताची अपेक्षा) यामध्ये अडकून राहतो. कृष्णजींनी, एखाद्या गोष्टीची जबाबदारी आणि जबाबदार असणं यामध्ये असलेल्या फरकाविषयी अतिशय महत्त्वपूर्ण विवेचन केलं आहे. प्राध्यापक अँडरसन यांच्याबरोबर केलेल्या एका संवादात ते म्हणतात: जबाबदारी असणं आणि जबाबदार असणं ह्या दोन्ही गोष्टींमध्ये निश्चितच काही फरक आहे. एखाद्या गोष्टीची जबाबदारी असणं – ह्यातून दिशा सुचवली जाते; पण ‘जबाबदारीची जाणीव असणं’ ही सर्वसमावेशक अशी स्थिती आहे, तिथे एकच एक दिशा अभिप्रेत नसते. शिक्षण, राजकारण, माझी जीवनशैली, माझं वागणं ह्या सर्वच गोष्टींची जबाबदारी इथे स्वीकारली जाते. सर्व गोष्टींना पूर्णपणे जबाबदार असण्याचं भान इथे दिसून येतं आणि त्यातूनच सर्व कृतींना चालना मिळते.

कृष्णजींची शिकवण आपल्या दैनंदिन जीवनात उतरवताना आपण काय करतो हे स्पष्ट करताना श्री कंदास्वामी यांनी पुढील मुद्द्यांचा निर्देश केला : (अ) आपल्याला सोयीस्कर वाटेल अशा पद्धतीने शिकवणीचा अर्थ लावण्याची प्रवृत्ती सर्वांमध्ये दिसून येते. प्रत्यक्षात ही शिकवण एखाद्या झंझावातासारखी आहे पण आपण तिचं रूपांतर एखाद्या सुखद झुळूकेमध्ये करतो आणि झोपी जातो. (ब) आपण शब्द, सिद्धांत आणि संकल्पना यांची बांधिलकी मानतो; बौद्धिक आणि शाब्दिक आकलनाला चिकटून राहतो. कृष्णजींना ह्या गोष्टी नामंजूर होत्या. (क) आपल्याला सर्व गोष्टी अर्धवट स्तरावर सोडून द्यायची सवय असते. अर्धवट आकलन, अर्धवट जाणीव इत्यादी. कृष्णजींनी अशा गोष्टी कधीच स्वीकारल्या नाहीत.

श्री. कंदास्वामींच्या विवेचनानंतर लगेच फाउंडेशनचे विश्वस्त आणि राजघाट ग्रामीण केंद्राचे माजी डायरेक्टर चिदानंदजी यांनी आपले काही मुद्दे मांडले. त्यातले काही मुद्दे पुढे नमूद केले आहेत. (अ) बघणं आणि कृती यामध्ये अजिबात वेळ-अंतर असू नये; अंतर राहिलं तर ती कृती खंडित स्वरूपाची असेल. बघण्याची कृती योग्य प्रकारे झाली तर तिचं पर्यवसान योग्य कृतीत होतं. (ब) दयाळूपणाची सुरुवात स्वत:च्या घरापासून केली पाहिजे, अशी जुनी म्हण आहे. दयाळूपणाप्रमाणेच जबाबदारीच्या बाबतीतही हेच म्हणता येईल. जगाच्या बाबतीतल्या आपल्या जबाबदाऱ्यांची सुरुवातसुद्धा, आपण ज्या माणसांबरोबर राहतो, ज्यांच्याशी आपली जवळीक असते त्यांच्यापासून केली पाहिजे. (क) तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात फार प्रगती झाली असली तरी संघर्षाचं प्रमाण मात्र अजूनही कमी झालेलं नाही. संघर्षाविषयी सैद्धांतिक स्तरावर बरंच संशोधन होत असलं तरी त्याला जीवनशैलीतील बदलांची जोड देण्यात आलेली नाही. (ड) आपण आंतरिक परीक्षण करण्याची गरज आहे. आपला गाभा तपासून पाहिला तर कदाचित आपणही एखाद्या दहशतवादी संघटनेच्या सूत्रधारापेक्षा फार वेगळे नाही हे जाणवेल. आपल्यामध्येही छोट्या-मोठ्या प्रमाणात हिंसकपणा आहेच. असहिष्णू प्रवृत्ती कोणामध्ये नाहीत? (इ) सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ‘हे करा’ आणि ‘हे करू नका’ अशा आशयाच्या याद्या करून परिवर्तन होणार नाही.

दुसऱ्या दिवशी चेन्नई येथील द स्कूल या KFI शाळेच्या माजी विद्यार्थिनी श्रीम. अपर्णा राजगोपाळ यांनी हलक्या प्रतीच्या जमिनीची निगा राखत, निकस जमिनीचा पुनरुद्धार करणं याविषयी अतिशय भावपूर्ण असं भाषण केलं. या भाषणाच्या ओघात, त्यांना प्रेरणा देणाऱ्या ‘वन स्ट्रॉ रेवल्युशन’ ह्या पुस्तकाचा ऋणनिर्देशही त्यांनी केला. माता, प्राणी आणि झाडं यांची निगा राखणं – त्यांच्या सहवासात राहणं हे आपल्या आंतरिक जीवनाच्या दृष्टीने किती आवश्यक आहे हे त्यांनी स्पष्ट केलं. ‘दुष्काळाच्या वेळी समतोल राखणं’ याविषयी बोलताना, ‘आपल्या मनातही दुष्काळ’ असू शकतो ह्या गोष्टीकडेही त्यांनी लक्ष वेधलं. संध्याकाळी आपल्या कामावर आधारलेला ‘स्लाईड-शो’ त्यांनी सादर केला. त्यांनी दिल्लीजवळ सुरू केलेल्या शेतीसंबंधी विविध प्रयोगाविषयी तसेच शेतीला उपयुक्त जनावरांविषयी करत असलेल्या अभिनव उपक्रमांविषयी माहिती दिली.

त्यानंतर ऋषी व्हॅली शाळेचा माजी विद्यार्थी वेदान्त भारद्वाज याने एकतारीवर संत कबीराची निर्गुणी भजनं सादर केली आणि श्रोत्यांनी त्याला उत्स्फूर्त दाद दिली.

तिसऱ्या दिवशी, सॅमडाँग रिम्पोचेजी यांनी, ‘नातेसंबंध हा जीवनाचा अविभाज्य असा घटक आहे’ याविषयी चर्चा केली.

'जबाबदारीने जगणं' हा या संमेलनाचा चर्चाविषय होता. त्या संदर्भात, नातेसंबंधाच्या मुद्द्यावर चर्चा करणं अगदी संयुक्तिक होतं. या संदर्भातले आपले विचार मांडताना रिम्पोचेजी म्हणाले की, 'सामूहिक शोध' म्हणजे संवाद. इतरांपासून विलग होऊन केवळ स्वत:च्या जोरावर आपण काही करू शकत नाही; म्हणूनच संमेलन होणं आवश्यक आहे. याबरोबरच 'सत्संगालाही' महत्त्व दिलं पाहिजे. जबाबदारीविषयी बोलताना आपण नेहमी 'कर्तव्य' हा शब्द वापरतो; रिम्पोचेजींनी सांगितलं की त्यांना हा शब्द अधिक उचित वाटतो कारण त्यात आत्मशोधाचा भाव आहे. जबाबदारी ह्या शब्दात प्रतिसादाची अपेक्षा सूचित होत असल्यामुळे तिथे इतरांना सामावून घेण्याचीही जाणीव होते. 'जबाबदारीने जगणं' म्हणजे काय हे समजून घ्यायचं असेल तर स्वत:ला हे विचारावं लागेल: माझं स्वत:च्या बाबतीतलं दायित्व काय आहे आणि जीवनाच्या बाबतीतलं कर्तव्य काय आहे?

मी फक्त माझ्या शरीराचीच नाही तर माझ्या मनाचीही काळजी घ्यायला शिकलं पाहिजे; मी आपल्या पृथ्वीची काळजी घ्यायला शिकलं पाहिजे कारण तिची जागा दुसरं कोणीच घेऊ शकत नाही. माझ्या कर्तव्याच्या केंद्रस्थानी ह्या गोष्टी असायलाच हव्या.

आजच्या जगात हक्कांची ठामपणे मागणी केली जाते, पण कर्तव्याचा मात्र विचार केला जात नाही. पण कर्तव्यांचं पालन न करण्यामुळेच हक्कांची पायमल्ली होते हे स्पष्ट आहे. हक्क आणि कर्तव्य यामधला फरक आणि परस्परसंबंध याकडे लक्ष वेधणं हीसुद्धा माझ्या जीवनासंबंधीच्या कर्तव्यातली एक महत्त्वाची गोष्ट आहे.

आजच्या जगात, स्पर्धेविना समाज पुढे जाऊ शकणार नाही ही भावनाच मूळ धरत आहे. ह्या भावनेला-विचाराला आव्हान देणं हा माझ्या कामाचा-कर्तव्याचा भाग आहे. एका श्रोत्याने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना, रिम्पोचेजींनी हे सांगितलं की, धर्म या शब्दाचा मूळ अर्थ पाहिला तर 'धार्मिक ओळख' ही विसंगत गोष्ट आहे हे लक्षात येतं; म्हणूनच, जेव्हा जेव्हा ओळख करून देण्याची वेळ येते तेव्हा स्वत:ला आव्हान देणं हे माझं कर्तव्य आहे. आणखी एका प्रश्नाला उत्तर देतांना त्यांनी हे स्पष्ट केलं की शाब्दीक पातळीवर बुद्ध व कृष्णजी यांच्या बोलण्यात कदाचित काही विसंगती जाणवेल; पण थोर व्यक्तींच्या शब्दांवर सर्वस्वी विसंबून राहणं योग्य नाही; आपल्या पुढील प्रश्नांचा आपणच वेध घेतला पाहिजे. असं करणं हासुद्धा माझ्या कर्तव्याचाच भाग आहे.

डॉ. शिराळी यांनी समारोपाचं भाषण करताना या संमेलनातील चर्चांमधून निर्माण झालेल्या प्रश्नांचा परामर्श घेतला. तर्कवितर्क न करता स्वत:ला कठीण प्रश्न विचारणं ही आपली जबाबदारी आहे, असं म्हणत त्यांनी आत्मचिंतनासाठी काही प्रश्न उभे केले:

१) कृष्णमूर्तींनी असं सुचवलं आहे की बेजबाबदार मनोवृत्ती असलेल्यांशी जाणीवपूर्वक संवाद साधणं शक्य नसतं; बेजबाबदारपणावर हल्ला चढवणं योग्य नाही. त्यामुळे प्रतिकारात्मक आणि आक्रमक भावनाच निर्माण होतात. जर आपल्याला अशा बेजबाबदार मनोवृत्तीशी संवाद साधायचा असेल तर ते अभावितपणे झालं पाहिजे. परंतु ह्याचा अर्थ काय होतो? त्या अबोध मनाला साद घालणं म्हणजे काय?

२) आपण समाजात जगताना पाळावी लागणारी सामाजिक शिस्त आणि जीवनातील मूलभूत प्रश्न यांची राष्ट्रीय जाणीवांशी कशी सांगड घालू शकतो? स्वत:ची ओळख, धर्म, पर्यावरण, विकास, नागरी जाणीवा यामध्ये माझी काय भूमिका असेल? उदाहरण घ्यायचे तर फ्रेंच चित्रकार पॉल गॉगिन यांनी १८९७ साली म्युरल चित्र रेखाटताना स्वत:ला हे प्रश्न विचारले होते: १)आपण कुठून आलो? २)आपण काय आहोत? आणि ३)आपण कुठे चाललो आहोत? अशा बाबींसंबंधी राष्ट्रीय जाणीवांना चेतना देण्याची अत्यंत गरज आहे; लोकांना त्याविषयी गंभीरपणे विचार करण्यास प्रवृत्त करण्यासाठी आपण काय केलं पाहिजे? कारण आज जग विरुद्ध दिशेने प्रवास करीत आहे.

३) नागरी सुजाणपणाचा अभाव ही आज अतिशय दु:ख देणारी बाब झाली आहे. प्रत्येक स्तरावर आज एवढे तीव्र भेद-विभाजन का निर्माण झाले आहेत? अगदी क्षुल्लक कारणावरून ताण-तणाव निर्माण करणाऱ्या भेदाभेदांना मी कसा आळा घालू शकतो?

४) कृष्णमूर्तींनी आपल्या समोर ठेवलेली भाषा, शब्द, उपमा बदलण्यासाठी मी कशाप्रकारे मदत करू शकतो? कारण मला वाटतं की, आपण जे पाहतो, जे आपल्याला सापडतं, ज्याचा आपण शोध घेतो ते व्यक्त करण्यासाठी आपल्याला आपले शब्द शोधले पाहिजेत. आपले शोध, संशोधन, अंतर्दृष्टी व्यक्त करण्यासाठी आपली स्वत:ची अभिव्यक्ती शोधली पाहिजे. कृष्णमूर्तींच्या परिभाषेची आपल्याला सवय झाली आहे. आपण त्या परिभाषेच्या पलीकडे जाऊ शकत नाही. तीच आपली मर्यादा ठरली आहे.

कृष्णमूर्तींच्या कार्याचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला समजेल की त्यांनीसुद्धा १९३० नंतर हेच केलं. जे शब्दातीत आहे ते शब्दांमधून व्यक्त करण्यासाठी थिऑसॉफीच्या शब्दप्रणालीत नसलेले शब्द शोधण्याचा प्रयत्न केला; स्वत:चे साधे शब्द, परिभाषा वापरायला सुरुवात केली. आपणही याची सुरुवात करणं ही आपली जबाबदारी आहे.

५) भूतकाळातील एका टप्प्यावर, कदाचित ५०,००० वर्षांपूर्वी आपण काल्पनिक जग, काल्पनिक वास्तव निर्माण करण्याची कला शिकलो आहोत आणि कालौघात हे काल्पनिक जग हे प्रत्यक्ष जगापेक्षा खरं असतं असं मानू लागलो. कल्पना, संकल्पना आणि प्रतिमा यांचाच आपल्या जीवनावर प्रत्यक्ष परिणाम आणि प्रभाव पडला आणि बाहेरीच्या जगावरील आपलं प्रभुत्व वाढत गेलं. परिणामी पर्यावरणाला प्रदूषित करण्याची आपली क्षमता बळावली आणि आपल्या समस्यांना आपण तंत्रज्ञानाचा उपाय शोधू लागलो. आपण आज कल्पना आणि संकल्पनाच्या जगामध्ये किती खोलवर रुतलो आहोत याचं आपल्याला भान आहे का? या प्रभावाची पकड आणि बळ याची आपल्याला जाणीव आहे का? शब्द कावेबाजपणे गरजा निर्माण करतात आणि आपल्या गरजांच्या पलीकडे जाऊन आपण चंगळवादी कसे बनतो याचं आपल्याला भान राहतं का? या चक्रव्युहामध्ये आपण फार काळ जगत आलो आहोत. प्राचीन मानवी इतिहासामध्ये कदाचित आपण याचा उगम शोधू शकतो.

ॲल्डस हक्सले यांच्या शब्दात सांगायचं तर 'शब्दांच्या धाग्यामधून आपले अनुभव गुंफलेले असतात'. त्याच धाग्यामधून 'स्व' विषयींच्या आपल्या कल्पना, संकल्पना, प्रतिमा आपण गुंफतो. शब्दांची पोच आणि सामर्थ्य प्रचंड असू शकतं.

कृष्णमूर्तींची जबाबदारी विषयी काही अवतरणे:

१)''व्यक्ती म्हणून जगामध्ये प्रचंड बदल घडवून आणण्याची तुमची जबाबदारी आहे, कारण तुम्ही या समाजाचे घटक आहात, कारण माणसाच्या अफाट दु:खाचे तुम्ही अंश आहात; हा सततचा प्रयत्न, धडपड, यातना आणि चिंता याला तुम्हीच जबाबदार आहात.

(पृष्ठ १२ वर पाहा...

स्वतःला जाणल्याशिवाय हरएक प्रकारची फसवणूक शक्य असते

कृ.: अवधान आणि अनवधान यात काय फरक असतो? जर तुम्ही एका विशिष्ट प्रणालीमध्ये प्रशिक्षित झाला असाल तर तुम्ही त्यासाठी खूप अवधान देता. बाकीच्या वेळी तुम्ही अवधान देत नाही. बरोबर? ही वस्तुस्थिती आहे, साहजिक मानवी वास्तव आहे. मी जर एखाद्या गोष्टीमध्ये प्रचंड रस घेत असेन तर मी त्याला अवधान देतो बाकीच्या वेळी मी जागरूक नसतो.

प्र.: परंतु तुम्ही निरनिराळ्या अंतराने एकापेक्षा अधिक गोष्टींना भान देत असता. तुम्ही अनेक निरनिराळ्या गोष्टींकडे अवधान देत असता.

कृ.: तेव्हा अवधान हे महत्त्वाचे असते. अनेक गोष्टींना अवधान देणे नव्हे.

प्र.: फक्त अवधानच महत्त्वाचे असते का?

कृ.: अर्थातच.

प्र.: ज्या गोष्टींना तुम्ही अवधान देता त्या गोष्टींपेक्षा

कृ.: ज्या क्षणी...

प्र.: परंतु संपूर्ण अवधानाची संकल्पना.

कृ.: ठीक आहे. आपण 'संपूर्ण' शब्द बाजूला ठेऊ. अवधान म्हणजेच संपूर्ण अवधान आणि आपल्याला स्वतःला समजून घेतले पाहिजे... बरोबर. हेच ध्यानाचे महत्त्व असते – काळ, इच्छा सर्व गोष्टी ज्यामुळे 'मी' बनलेलो आहे. मी म्हणजे काय? जर मी स्वतःला जाणले नाही तर मी स्वतःची सतत फसवणूक करीत असतो. पूर्वी माझा एक मित्र होता. तो भारतीय आहे. सुशिक्षित, इंग्लंडमध्ये केंब्रिजमध्ये शिकलेला आणि भारतामध्ये चांगला प्रतिष्ठा असलेला आणि तो न्यायाधीश झाला. एक दिवशी तो सकाळी उठला आणि स्वतःशीच म्हणाला, मी या लोकांवर निकाल–निर्णय देत असतो, पण सत्य काय असते? आणि भारतीय परंपरेचा तो एक भाग असतो, विशेषतः ब्राह्मणांमध्ये कुटुंब सोडून जायचे, वगैरे वगैरे आणि ध्यानाच्या तपाच्या साहाय्याने सत्य काय ते शोधून काढायचे. तो तसे स्वतःशीच म्हणाला, तुम्हाला समजतंय का? तर तो अरण्यात वनात निघून गेला आणि पंचवीस वर्षे तो सत्य शोधून काढण्यासाठी ध्यान करीत राहिला. कोणीतरी त्याला वक्त्याच्या एका भाषणाला घेऊन आला आणि त्या भाषणानंतर तो वक्त्याला भेटायला आला आणि म्हणाला, 'पाहा की, मी पंचवीस वर्षे स्वतःला फसवत आलो आहे.' तुम्हाला समजतंय का? त्या माणसाच्या धैर्याची कल्पना करा. तेव्हा आम्ही त्याविषयी बरेच काही बोललो. आता, मी स्वतःला समजून घेतल्याशिवाय 'स्व' म्हणजे काय, 'अहं', व्यक्ती, व्यक्तिमत्त्व वगैरे हे समजून घेतल्याशिवाय मी जरी उर्वरीत आयुष्यभर ध्यान करीत राहिलो, तरी मी स्वतःला फसवीतच असेन. तुम्हाला समजतंय का? मी भ्रमाच्या मोठ्या साखळीमध्ये जगत असेन, असा विचार करीत की तेच सत्य आहे म्हणून. तेव्हा मी स्वतःला समजून घेतले पाहिजे. म्हणून मी मानसशास्त्रज्ञ, फ्रॉइड वगैरे सारख्यांकडून समजून घेणे नव्हे, तर मी स्वतःच स्वतःला समजून घेतले पाहिजे, कोणा इतरांच्यामार्फत नव्हे. तुम्हाला समजतंय ना?

प्र.: तुम्ही स्वतःला फसवीत असता याची तुम्हाला कधीच जाणीव – खात्री नसते.

कृ.: मी तुम्हाला ते दाखवून देतो. एक गोष्ट खरी आहे मी स्वतःला जाणून घेतले पाहिजे. कुठच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे नव्हे, कुठच्या शास्त्रज्ञाप्रमाणे, कुठच्यातरी मानसशास्त्रज्ञाप्रमाणे नव्हे – कुठच्याही पद्धतीप्रमाणे नव्हे तेव्हा मी ती पद्धत समजून घेत असतो. स्वतःला नव्हे, यातील फरक पाहा. आता मी स्वतःला कोणत्याही फसवणुकीशिवाय कसे समजून घ्यावे नाहीतर मी चुकीचा खेळ खेळत असतो. कारण अखेर शेवटी मी स्वतःला फसवीत असतो. तेव्हा मी स्वतःला पूर्णपणे कसे समजून घ्यावे की तेथे फसवणुकीची कोणतीही छाया असणार नाही, मी हे पुढे चालू ठेवू का, कृपया विश्वास घ्या की हा संवाद आहे.

प्र.: आपल्या भावनांबद्दल काय करायचे?

कृ.: भावना या विचारांचाच भाग आहे, नाही का? मला जाणवते, मी भावना ओळखतो. या क्षणी ते जरा बाजूला ठेवा.

प्र.: सर, स्वतःला समजून घेण्यासाठी परत आपण अवधानाकडेच येत आहोत का?

कृ.: नाही. मी तुम्हाला दाखवून देणार आहे. तुम्हाला फार घाई झाली आहे. मला स्वतःला जाणून घ्यायचे आहे आणि मी स्वतःला असे पूर्णपणे जाणून घेतले पाहिजे की तिथे जरासुद्धा फसवणूक असता कामा नये. प्रचंड सचोटी आणि प्रामाणिकपणा. बरोबर, नाहीतर त्याला अर्थ नाही. तुम्हाला हे मान्य आहे का? प्रामाणिकपणा आणि सचोटी. तेव्हा मी प्रामाणिक आहे, जिज्ञासू आहे हे कसे ओळखावे – विशेषतः माझा विशुद्ध परखडपणा? ख्रिश्चन जगामध्ये – संपूर्ण ख्रिश्चन धर्म हा बायबलवर आधारित आहे. तुमचा तारणकर्ता वगैरे आणि ख्रिश्चनिटी शंका घ्यायला, प्रश्न विचारायला परवानगी देत नाही. बरोबर? धार्मिक ख्रिश्चनामध्ये – कुठचीही शंका – तार्किकता यांना वाव नाही. जर तिथे तार्किकता आणि शंका असेल तर तो कोसळून पडेल. जेव्हा आम्ही इटलीमध्ये होतो – मला इटालियन भाषा थोडीफार येते – आणि पोपना म्हणताना ऐकले, ते काहीतरी प्रवचन देत होते – ते म्हणाले, 'तुम्ही अधिक श्रद्धाळू बनलं पाहिजे,' आणि माझा मित्र जो माझ्याजवळ बसला होता तो मला म्हणाला, 'पाहा, ते हेच करीत आहेत. कुठचाही शोध घेण्याची तुमची प्रेरणा मारण्यासाठी ते श्रद्धा रुजवीत आहेत.' म्हणून प्रचंड प्रामाणिकपणा पाहिजे, जे फार कठीण असते. आणि तिथे फार मोठी सचोटी पाहिजे.

प्र.: ख्रिश्चनिटीच्या श्रद्धेची दुसरी व्याख्या आहे दृढ विश्वास. तुमची शोध घेण्याची प्रेरणा केवळ नष्ट करणे नव्हे, परंतु दृढ विश्वास असणे.

प्र.: दुसरी गोष्ट म्हणजे दृढ निष्ठा, तेच तो म्हणतो आहे.

कृ.: दृढ विश्वास, दृढविश्वास कोणावर, बायबलमध्ये का? कोणावर निष्ठा ठेवायची, तुम्ही तुमच्या पत्नीवर विश्वास ठेवता का, तुम्ही पतीवर विश्वास ठेवता का, तुमच्या अध्यक्षावर विश्वास ठेवता का? तुम्ही विश्वास का ठेवता? विश्वास ठेवणे म्हणजे तुम्हाला काय म्हणायचं आहे? जर तिथे शंका असेल तर तुम्ही चौकशी करता, शोध घेता, तुम्ही विचारता, तुम्ही स्पष्टीकरण मागता.

प्र.: तुम्ही विश्वासही ठेऊ शकता आणि तरीसुद्धा तुम्ही ईश्वराच्या स्वरूपाविषयी शोध घेऊ शकता.

कृ.: महाशय, विश्वास म्हणजे काय? मी विश्वास ठेवतो, माझी पत्नी आहे, मी तिच्यावर विश्वास ठेवतो कारण माझे तिच्यावर प्रेम असते. मला माहीत असते की, ती माझे काहीही वाईट करणार नाही आणि मला माहीत असते की, मी तिचे काही वाईट करणार नाही कारण माझे

तिच्यावर प्रेम असते. जिथे प्रेम असते तिथे विश्वास असतो. तुम्ही केवळ विश्वासासाठी विश्वास ठेवत नाही – त्याचा गर्भितार्थ प्रेम असणे. कृपया आपण परत आपल्या विषयाकडे येऊया.

तेव्हा मी स्वत:ला जाणले पाहिजे. स्वत:ला जाणल्याशिवाय हरएक प्रकारची फसवणूक शक्य असते. बरोबर? तुम्हाला हे मान्य आहे का? प्रामाणिकपणा, सचोटी आणि तार्किकता, शंका. आणि ती शंका, कुत्र्याच्या गळ्यातील साखळीसारखी तुम्हाला जोडलेली पाहिजे. अधूनमधून कुत्र्याला साखळीतून मुक्त करता कारण त्याला धावणे शक्य व्हावे. परंतु तुम्ही त्याला सतत साखळीमध्ये बांधून ठेवता, तो कधी मोकळा नसतो, त्याच्यामध्ये शक्ती उरत नाही. तो जातीवंत कुत्रा राहिलेला नसतो. तेव्हा आपल्याला ती गुणवत्ता पाहिजे. बरोबर. आता मी स्वत:ला कसे जाणून घ्यावे? हा ध्यानाचा विषय आहे, तुम्हाला समजतंय का? मी स्वत:ला माझ्या आजूबाजूच्या वातावरणाबरोबर असलेल्या संबंधांमधून जाणू शकतो – माझे पत्नीबरोबर असलेले संबंध, माझ्या वडिलांबरोबर असलेले संबंध – या सर्वांच्या संबंधांमधून मी स्वत:ला जाणून घेऊ शकतो. माझ्या संबंधामधून मी माझ्या प्रतिक्रिया पाहतो, बरोबर? आपण एकमेकांबरोबर संवाद करत आहोत ना? आतापर्यंत ठीक आहे ना? तुम्हाला मान्य आहे का? कारण परस्परसंबंधाशिवाय मला अस्तित्वच नसते. मी कुठच्यातरी मठात जाऊ शकतो, परंतु तरीसुद्धा मी संबंधामध्ये अडकलेला असतो, भूतकाळाशी जखडलेला, येशू ख्रिस्त काय म्हणाला या संकल्पनेमध्ये अडकलेला असतो, इ. इ. तेव्हा मी नेहमीच परस्परसंबंधांमध्ये जगत असतो. बरोबर, त्या परस्परसंबंधाच्या आरशामध्ये जसा मी आहे तसा स्वत:ला पाहतो, मी कसा असावे हे नव्हे तर प्रत्यक्ष मी जसा आहे तसाच मी स्वत:ला पाहतो.

लॉस अलमॉस येथे शास्त्रज्ञांबरोबरील संवाद, १९८४

मन 'स्व'चे महत्त्व वाढविण्याचा भ्रम कसा निर्माण करते

सर्वांगाने समग्रपणे निरीक्षण करणे म्हणजेच निरीक्षण करणे असते – किंवा लक्षपूर्वक ऐकणे असते – एखाद्या गोष्टीच्या समग्र आशयाचे निरीक्षण करणे किंवा ऐकणे असते. सामान्यत: आपण गोष्टीकडे अंशत: पाहत असतो. आपल्या सुखाप्रमाणे, आपल्या संस्कारबद्धतेप्रमाणे, आदर्शवादी दृष्टिकोनातून, आपण नेहमीच तुकड्या–तुकड्याने विभागत: गोष्टीकडे पाहत असतो. राजकारणी आपल्या राजकारणाशी संबंधित असतो. अर्थशास्त्रज्ञ, शास्त्रज्ञ, धंदेवाईक मनुष्य – प्रत्येकजण त्याच्या स्वत:च्या व्यवसायाप्रमाणे सर्वसाधारणपणे आयुष्यभर पाहत असतो, जगत असतो. असं वाटतं की, आपण कधीच जीवनाच्या समग्र हालचालीचे निरीक्षण करीत नसतो. जशी एखादी दुथडी भरून वाहत असलेली नदी आपण पाहतो – पहिल्यापासून शेवटपर्यंत पाणीच पाणी असते. ते प्रदूषित होत असेल, पण तिचा विस्तार जर लांबवर असेल तर ती स्वत:च शुद्ध होत जाते. म्हणून, त्याचप्रकारे, आपण या जीवनाला समग्रतेने सामोरे गेले पाहिजे – संपूर्णपणे सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत कोणत्याही प्रकारचे विभाजन न करता, मार्गापासून विचलित न होता, कोणताही भ्रम निर्माण न करता. हे समजणे खूप महत्त्वाचे आहे की मन 'स्व'चे महत्त्व वाढविण्याचा भ्रम कसा निर्माण करते आणि असेच भ्रम- निदान त्या वेळेपुरते तरी जे सुख देणारे आणि सुरक्षितता देणारे असतात. आपण पूर्वग्रहीत कल्पना किंवा श्रद्धेने कुठेतरी पाहत असतो, त्यामुळे आपण प्रत्यक्ष कधीच पाहत नाही.

इच्छापूर्तीमध्ये समाधान शोधताना भ्रम निर्माण होतात. समाधान हे परमानंदाहून पूर्णपणे निराळे असते. परमानंद म्हणजे असण्याची किंवा नसण्याची अवस्था जी आपल्या बाहेर असते. परमानंदाची ही अवस्था अशी असते की तेथे अनुभव घेणे नसते. ज्या क्षणी तेथे अनुभव घेणे सुरू होते, तेव्हा तेथे 'स्व' त्याच्या भूतकाळातील स्मृतीसह वावरत असतो; त्याच्या आठवणी, त्याचे रूपांतर करणे, भ्रम निर्माण करणे. परमानंद कधीच भ्रम निर्माण करीत नाही. तुम्ही परमानंदाला पकडून ठेऊ शकत नाही. कारण तो तुमच्या बाहेर असतो. त्याची आठवण काढण्याचा प्रश्नच येत नाही, त्याचा हव्यास धरण्याचा पण प्रश्न येत नाही. त्याचा हव्यास धरणे म्हणजे इच्छापूर्ती असते, ती भ्रम निर्माण करते.

आपल्यापैकी बहुतेक जण कुठल्या ना कुठल्या भ्रमामध्ये अडकलेले असतात – असणे किंवा नसण्याचा भ्रम, सत्तेचा भ्रम, प्रतिष्ठेचा भ्रम इ. इ. या सर्व गोष्टी केंद्रामधून प्रक्षेपित झालेल्या असतात – जो 'मी' असतो. भ्रम म्हणजे विषयासक्तीने, निष्कर्षासहित, पूर्वगृहदूषित किंवा कल्पना करून पाहणे असते.

जे मन भ्रमामध्ये अडकलेले असते त्याला व्यवस्था (order) नसते. व्यवस्था समग्रतेसह जगण्यामधून येऊ शकते. आपल्याला व्यवस्थेची गरज आहे. अगदी एखादी लहानशा खोलीमध्येसुद्धा जर गोष्टी व्यवस्थित जागेवर असल्या तरी ती चांगली दिसते. नाहीतर ती अव्यवस्थित, वाईट दिसते आणि त्यामध्ये स्वास्थ्य नसते. आपण मानसिकदृष्ट्या विचार करतो की व्यवस्था ही विशिष्ट साचा (Pattern) किंवा नित्यक्रमाचे पालन केल्यामुळे येते जी आपण भूतकाळामध्ये प्रस्थापित केलेली असते. मानसिकदृष्ट्या व्यवस्था ही पूर्णपणे काहीतरी निराळीच गोष्ट आहे. ती फक्त ज्यावेळी जिथे स्पष्टता असते तेव्हाच येते. स्पष्टतेतून व्यवस्था निर्माण होते, व्यवस्थेतून स्पष्टता येत नाही. व्यवस्था आणण्याचा प्रयत्न करणे हे यांत्रिक बनून जाते, अशाच एका साचाबरोबर जुळवून घेणे असते ज्यामध्ये स्पष्टता असू शकत नाही.

व्यवस्थेला दैनंदिन जीवनात एकसूत्रता (harmony) नसते. आपण कल्पनांच्या पिंजऱ्यामध्ये अडकलेलो आहोत आणि त्यामध्ये एकसूत्रता नसते. एकसूत्रता आणि स्पष्टता या सर्व गोष्टींकडे सर्वसमावेशकतेने बघणे असते, जीवनाकडे संपूर्ण एकच हालचाल म्हणून निरीक्षण करणे असते. मी ऑफिसमध्ये व्यावसायिक असतो, घरी निराळा असतो असे नव्हे, मी कलाकार आहे आणि म्हणून मूर्खासारखे विक्षिप्त गोष्टी करू शकतो असे नव्हे. जीवन असे तुटक तुटक पाहणे नव्हे. तुकड्या – तुकड्यामध्ये, जीवन अशा निरनिराळ्या वर्गवारीमध्ये पाहणे, प्रतिष्ठित आणि अप्रतिष्ठित, कामगार आणि काम न करणारा, बुद्धिवादी आणि स्वप्नाळू – जसे आपण सामान्यपणे जगत असतो. जीवन एक समग्र हालचाल आहे असे पाहणे ज्यामध्ये प्रत्येक गोष्ट सामावलेली आहे. त्यामध्ये विभाजन नसते, चांगले जीवन आणि वाईट, स्वर्ग आणि नरक असे नसते, सर्वसमावेशकतेने पाहा त्यामुळे जेव्हा तुम्ही मित्राचे निरीक्षण करता किंवा तुमच्या पत्नीचे वा पतीचे – तेव्हा त्या संबंधामध्ये तुम्ही त्याकडे सर्वार्थाने समग्रतेने पाहत असता.

The Wholeness of Life Part II, chp.17
सानेन १९७७, भाषण ६

पृष्ठ ९ वरून पुढे...)

ही अपार जबाबदारी ओळखल्याशिवाय आणि जबाबदारीच्या प्रत्यक्ष संपर्कात आल्याशिवाय आणि जबाबदारीच्या संपूर्ण रचनेचा, जबाबदारीच्या यंत्रणेचा लक्षपूर्वक वेध घेतल्याशिवाय तुम्ही काहीही करा, प्रत्येक मंदिरात जा, अनेक गुरुंकडे जा, मास्टर्सकडे जा, जगातल्या सगळ्या धार्मिक ग्रंथांची पारायणं करा, तुमच्या कृतीला काहीही अर्थ असणार नाही.

२) ''जागतिक समस्या ही व्यक्तीची समस्या आहे हे आपण विसरलो आहोत. कारण जगाच्या समस्या तुम्ही आणि आम्ही व्यक्ती म्हणून निर्माण केल्या आहेत. युद्धाच्या, भूकबळींच्या, शोषणाच्या आणि अशाच अगणित समस्या - ज्या तुम्हाआम्हाला आज भेडसावत आहेत - आणि जोपर्यंत आपण या प्रत्येक स्तरावर स्वत:ला समजून घेत नाही तोपर्यंत आपण या समाजाच्या सडलेपणाला, दुरावस्थेला जोपासत राहू.''

ज्या मनाने स्वत:ला त्याच्या समग्रतेसह जाणलेले असते

सतत अवधान हे फार कठीण काम असते. तुमच्या मनाचे वरवरचे स्तर तुम्हाला माहीत असतील, परंतु अबोध हेतू, तुमच्या प्रेरणा, भीती, परंपरांचे सुप्त अवशेष, वांशिक वारसा या सर्व गोष्टींबद्दल अवधान असणे आणि त्याकडे अगदी जवळून लक्ष देणे हे फार कठीण काम असते. त्याला प्रचंड ऊर्जा लागते. आपल्यापैकी बहुतेक जण असे जवळून अवधान देण्यासाठी तयार नसतात. आपण आपल्यातील सूक्ष्मभेद पाहू शकू, मनाच्या गुंतागुंतीच्या हालचाली शोधू शकू. स्वत:मध्ये पायरी-पायरीने शिरण्यासाठी लागणारी चिकाटी, सहनशीलता आपल्यामध्ये नसते. ज्या मनाने स्वत:ला त्याच्या समग्रतेसह जाणलेले असते आणि म्हणून ते स्वत:ची आत्मवंचना करू शकत नाही, असेच मन स्वत:ची त्याच्या भूतकाळापासून मुक्तता करू शकते आणि काळाच्या क्षेत्रामध्ये स्वत:च्या हालचालीच्या पलीकडे जाऊ शकते. ते खूप कठीण नसते, परंतु त्याला कठोर परिश्रमाची जरूरी आहे.

Collected Works, Vol. X, 253
Choiceless Awareness

ऋषी व्हॅली येथील या संमेलनामध्ये वरील उपक्रमांशिवाय विषयानुरूप कृष्णमूर्तींच्या दोन व्हिडिओ कॅसेटस् ऐकण्याचे कार्यक्रम झाले. तसेच दोन दिवस लहान लहान गटांमधून चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आलं होतं.

संमेलनातील कार्यक्रमांचे ध्वनीमुद्रण ऐकण्यासाठी www.rishivalley.org/news/gathering.html या Link वर पाहावे.

कृष्णमूर्तींविषयीच्या काही वेबसाईटस्:
www.jkrishnamurti.org
www.kfionline.org
www.rishivalley.org
www.j-krishnamurti.org
www.kfistudy.org
www.kscskfi.com
www.jkrishnamurtionline.org
www.kfa.org
www.kfoundation.org
www.kinfonet.org

मुंबई केंद्रः दरमहा कार्यक्रम
संध्या. ५.३० वाजता

कृष्णमूर्तींच्या भाषणांचे व्हिडिओ कार्यक्रम आणि त्यावर आधारित एकत्र संवाद

तिसऱ्या गुरुवारी
मुंबई केंद्र, हिम्मत निवास, ३१, डोंगरसी मार्ग, मलबार हिल
शेवटच्या सोमवारी
रिट्रीट हाऊस, केन मार्ग, माऊंट मेरी चर्चजवळ, वांद्रे

जे. कृष्णमूर्ती यांची शिकवण सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया' ही संस्था कार्यरत आहे. फाउंडेशनने चेन्नई, ऋषी व्हॅली, बंगलोर, मुंबई, वाराणसी आणि सह्याद्री येथे अध्ययन केंद्रे, शाळा स्थापन केल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी तेथील ग्रामीण समाजासाठी विकास केंद्रेही आहेत.

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यालय:
कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड,
चेन्नई - ६०० ०२८.
दूरध्वनी : ०४४ २४९३ ७८०३/७५९६
ई-मेल : info@kfionline.org
वेबसाईट : www.kfionline.org

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुंबई केंद्र:
हिम्मत निवास, मलबार हिल येथे असून येथे कृष्णमूर्तींची सर्व पुस्तके, डिव्हीडीज् उपलब्ध आहेत.
संपर्क :- कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
मुंबई एक्झिक्युटिव्ह कमिटी, हिम्मत निवास,
३१, डोंगरसी मार्ग, मलबार हिल,
मुंबई-४०००००६.
दूरध्वनी - ०२२ २३६३३८५६
ई-मेल : kfimumbai@gmail.com

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.

Published in January, May, September

Periodical

Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259

If undelivered please return to :
Krishnamurti Foundation India
Mumbai Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road,
Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com
Websites : www.kfionline.org, www.jkrishnamurti.org

Published by P.V. Dabholkar on behalf of Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai-400 006. Printed by S.V. Limaye at India Printing Works, 42, G.D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031. E-mail : indiaprintingworks@gmail.com ● Editor : Vasanti Padte
Designed by Eurythmic Designs. E-mail : info@Eurythmicdesigns.com